❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २९७ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

निःपक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



थोडक्यात...

राज ठाकरेंच्या फेसबूक पोस्टने खळबळ



मुंबई : दैनिक संध्या

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उद्योगपती गौतम अदानी यांच्यावर पुन्हा एकदा जोरदार निशाणा साधला आहे. काल घेतलेल्या पत्रकार परिषदेत "पुढच्या ४ ते ५ महिन्यांत देशात काहीतरी मोठी गडबड होणार असून, संपूर्ण देश रस्त्यावर उतरला तरी मला आश्चर्य वाटणार नाही,"असा खळबळजनक दावा राज ठाकरे यांनी केला होता. या वक्तव्यानंतर आज त्यांनी आपल्या अधिकृत फेसबुक अकाउंटवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गौतम अदानी यांच्यावरील एक वादग्रस्त डॉक्युमेंट्री फिल्म पोस्ट करत सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. राज ठाकरे यांनी ही डॉक्युमेंट्री शेअर करताना पोस्टमध्ये लिहिले की, सरकारला ही डॉक्युमेंट्री समाजमाध्यमांवरून गायब करायची आहे. याचं कारण काय असेल, ते तुम्हाला ही डॉक्युमेंट्री बघितल्यावर नक्कीच कळेल. त्यामुळे सरकारने ही डॉक्युमेंट्री नेटवर्कवरून हटवण्याआधीच सर्वांनी पाहून घ्या, असे त्यांनी म्हटले आहे. उद्योगपती गौतम अदानी यांच्यावरील एका डॉक्युमेंट्रीचा उल्लेख करत राज ठाकरे यांनी ती सोशल मीडिया आणि यूट्यूबवरून हटवण्यासंदर्भातील कथित दबावावर प्रश्न उपस्थित केले. सबीर भाटिया असे नाव घेत त्यांनी संबंधित डॉक्युमेंट्रीचा संदर्भ दिला.

क्लिप २ वर्षे का लपवून ठेवली? : रामदास कदम

मुंबई : दैनिक संध्या

"मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषदेत ऐकवलेली ऑडिओ क्लिप ही आजची नसून तब्बल 2 ते 2.5 वर्षांपूर्वीची, म्हणजेच 14 ऑक्टोबर 2024 ची आहे. या काळात विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी जरांगेंच्या अनेकदा भेटीगाठी झाल्या; मग ही क्लिप इतके दिवस स्वतःकडे का दाबून ठेवली? यात भाजपचा कोणताही बडा नेता नाही. उलट, भाजपच्या एका आमदाराला आपल्या गुप्त बैठकीत सोबत बसवून 'या बैठकीत निम्मे एकनाथ शिंदेंचे चमचे बसलेत' असे म्हणत मराठा समाजाच्याच नेत्याला संपवण्याचा कुटील डाव रचणाऱ्या मनोज जरांगेंची स्वतःची क्लिप माझ्याकडे आहे," असा खळबळजनक प्रतिहल्ला शिवसेना (शिंदे गट) नेते रामदास कदम यांनी चढवला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी 500 कोटी रुपयांच्या कथित संभाषणाची 31 ते 32 मिनिटांची ऑडिओ क्लिप जाहीर केल्यानंतर, शिवसेना नेते रामदास कदम यांनी तातडीने पत्रकार परिषद घेऊन या क्लिपमागील हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि या संपूर्ण प्रकरणाच्या लेखी चौकशीची मागणी सरकारकडे जाहीर केली.

आर्थिक व्यवहार्य आणि शाश्वत जलप्रकल्प उभारण्यावर भर द्यावा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

अंमलबजावणीसाठी जमीन, वीज खर्च आणि प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या वापराचे नियोजन आवश्यक

■ मुंबई (दै. संध्या)

जलप्रकल्पांची आर्थिक व्यवहार्यता आणि दीर्घकालीन शाश्वतता सुनिश्चित करण्यासाठी प्रकल्पांसाठी आवश्यक जमीन, मार्गाधिकार व अन्य परवानग्या आधीच उपलब्ध असणे, तसेच वीज खर्च कमी करण्यासाठी सौरऊर्जा व बॅटरी साठवणुकीसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर करणारे ग्राहक निश्चित करून या प्रकल्पांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे गरजेचे असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळाच्या (आयएफसी) शिष्टमंडळासोबत मुख्यमंत्री यांच्या शासकीय निवासस्थानी महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा व जलप्रकल्पांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. या बैठकीत प्रकल्पांची अंमलबजावणी, वित्तपुरवठा, तांत्रिक उपाययोजना आणि निर्धारित कालमर्यादेत प्रकल्प पूर्ण करण्याबाबत चर्चा करण्यात आली. जागतिक बँकेच्या शिष्टमंडळात दक्षिण आशिया प्रादेशिक संचालक मारा वॉर्विक, भारतासाठी जलक्षेत्र व्यवस्थापक विल्यम रेक्स, आंतरराष्ट्रीय वित्त महामंडळाचे (आयएफसी) दक्षिण आशिया विभागातील पायाभूत सुविधा क्षेत्राचे व्यवस्थापक



नुरू लामा, तसेच हर्ष गोयल, नीरज गुप्ता, ललिता श्रीनिवास यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, की जागतिक बँकेसोबतचे सहकार्य हे केवळ आर्थिक मदतीपुरते मर्यादित नसून, संस्थात्मक आणि व्यवस्थात्मक बदल घडवून आणण्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे. आधुनिक तंत्रज्ञान, सक्षम कार्यप्रणाली आणि भविष्यातील पिढ्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या व्यवस्था विकसित करण्यामध्ये जागतिक बँकेचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. यापूर्वीही राज्याने जागतिक बँकेसोबत विविध क्षेत्रांत काम केले असून, यापुढेही हे सहकार्य अधिक व्यापक करण्याची आवश्यकता आहे. जलप्रकल्पांच्या दैनंदिन संचालनामध्ये वीज खर्च हा महत्त्वाचा घटक आहे. अनेक प्रकल्पांमध्ये तांत्रिक त्रुटींमुळे नव्हे, तर वीजबिलांचा खर्च परवडत नसल्यामुळे कामकाजात अडचणी निर्माण होतात. ही बाब लक्षात घेऊन प्रकल्पांच्या नियोजनाच्या टप्प्यापासूनच त्यांच्या संचालन खर्चाचा विचार करणे आवश्यक आहे. यासाठी सौरऊर्जा प्रकल्प, बॅटरी साठवणूक आणि उपलब्ध आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून वीज खर्च कमी करण्यावर भर द्यावा. त्यामुळे जलप्रकल्पांची आर्थिक व्यवहार्यता वाढून त्यांची दीर्घकालीन शाश्वतता सुनिश्चित करता येईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. सांडपाण्यावर प्रक्रिया केल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा प्रभावी पुनर्वापर करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर करणाऱ्या औद्योगिक आणि अन्य ग्राहकांची निश्चिती प्रकल्पाच्या नियोजनाचाच भाग असावा. यामुळे पाण्याची मागणी निर्माण होईल, पुनर्वापराला चालना मिळेल आणि प्रकल्पातील गुंतवणुकीचा काही भाग परत मिळविणे शक्य होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. प्रक्रिया केलेले पाणी औद्योगिक क्षेत्रे तसेच वीज निर्मिती प्रकल्पांना उपलब्ध करून देण्याबाबत यापूर्वी धोरणे आखण्यात आली आहेत. या धोरणांच्या अंमलबजावणीत अद्यावत सुधारणा करुन प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर वाढविण्यासाठी आवश्यक यंत्रणा विकसित करावी, असेही मुख्यमंत्री म्हणाले. बैठकीत प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील विलंब टाळण्यासाठी आवश्यक जमीन उपलब्ध असणे, मार्गाधिकार निश्चित असणे आणि सर्व संबंधित परवानग्या प्राप्त झालेल्या असणे महत्त्वाचे आहे. अनेकदा प्रकल्प मंजूर झाल्यानंतर जमीन उपलब्ध नसल्याने किंवा अन्य अडचणींमुळे काम सुरू होण्यास एक ते दोन वर्षांचा विलंब होतो. त्यामुळे वित्तपुरवठ्यासाठी निवडण्यात येणारे प्रकल्प प्रत्यक्ष गुंतवणुकीसाठी पूर्णपणे तयार असावेत, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. लहान शहरांमध्येही अशा पायाभूत सुविधांची मोठी गरज आहे. उपलब्ध संसाधनांचा एकत्रित वापर करून आणि विविध संस्थांमध्ये समन्वय साधून प्रकल्पांची अंमलबजावणी केल्यास वित्तपुरवठ्याचा खर्च कमी करता येईल. त्यामुळे प्रकल्प आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि दीर्घकाळ टिकणारे ठरतील, असेही त्यांनी नमूद केले.

सादर करण्यात आलेली प्रकल्पांची कालमर्यादा महत्त्वाकांक्षी असली, तरी योग्य नियोजन आणि समन्वयाच्या माध्यमातून ती साध्य करणे शक्य आहे. त्यामुळे सर्व संबंधित यंत्रणांनी निर्धारित कालमर्यादेनुसार काम करून प्रकल्पांची त्वरित अंमलबजावणी करावी. सुरुवातीला नियोजित प्रकल्प प्रभावीपणे राबवून त्यानंतर अशा प्रकल्पांचा विस्तार व्यापक स्तरावर करण्याची अपेक्षा मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली.

संभाजीनगरात भररस्त्यात तरुणाचा निर्घृण खून; मित्रानेच काढला काटा

■ छत्रपती संभाजीनगर (दै. संध्या)

छत्रपती संभाजीनगर शहरातील एन-७ सिडको परिसरात भररस्त्यात घडलेल्या हत्येचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. व्यावसायिक स्पर्धेतून आणि अंतर्गत वैमनस्यातून एका २२ वर्षीय तरुणाने आपल्याच जवळच्या मित्राचा अत्यंत निर्घृणपणे काटा काढला आहे. आधी पाठीमागून भरधाव कारने जोरदार धडक दिली आणि त्यानंतर यू-टर्न घेत जखमी अवस्थेत तडफडणाऱ्या मित्राच्या डोक्यात लोखंडी रॉड आणि लाकडी दांड्याने सपासप वार करून त्याची जागीच हत्या केली. देवेश उर्फ बंटी चंद्रेश दीक्षित (वय ३६) असे मयत तरुणाचे नाव असून, पवन दिलीप पराशर (वय २२, रा. वानखेडेनगर) असे आरोपीचे नाव आहे. या थरारक हत्येनंतर आरोपी पवन स्वतः कार घेऊन सिडको पोलीस ठाण्यात हजर झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत देवेश उर्फ बंटी दीक्षित आणि आरोपी पवन पराशर यांच्यात गेल्या अनेक दिवसांपासून व्यावसायिक आणि पैशाच्या कारणावरून वाद धुमसत होता. घटनेच्या दिवशी सकाळी बंटी नेहमीप्रमाणे जिम आटोपून आपल्या दुचाकीवरून घरी जात होता. आरोपी पवन हा आधीपासूनच कारमध्ये दबा धरून त्याच्या हालचालींवर पाळत ठेवून होता. बंटीची दुचाकी एन-७ सिडकोतील मंगेश गॅस एजन्सीसमोर पोहोचताच, पाठीमागून येणाऱ्या आरोपी पवनने कारचा वेग वाढवला आणि दुचाकीला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, बंटी हवेत उडून थेट रस्त्यावर कोसळला, तर त्याची दुचाकी तब्बल १५० फूट दूर असलेल्या विश्वास वाईन्स शॉपजवळ जाऊन आदळली. कारच्या धडकेने बंटी



■ आधी कारने उडवले, नंतर रॉडने ठेचून हत्या केली आणि पोलिस ठाण्यात झाला हजर

गंभीर जखमी अवस्थेत रस्त्यावर पडला होता. मात्र, आरोपीने गाडी न थांबवता पुढे जाऊन चौकातून अचानक यू-टर्न घेतला आणि कार पुन्हा जखमी बंटीच्या अंगाजवळ आणून थांबवली. कारमधून खाली उतरताना आरोपीने लाकडी दांडा आणि जाड लोखंडी रॉड काढला. रक्तबंबाळ अवस्थेत पडलेल्या बंटीच्या डोक्यात आणि चेहऱ्यावर त्याने अत्यंत क्रूरपणे एकापाठोपाठ एक घाव घातले. डोक्यात वर्मी घाव बसल्याने बंटी दीक्षितचा जागीच मृत्यू झाला.

भररस्त्यात हा थरार घडवून आणल्यानंतर, हल्लेखोर पवन पराशरने घटनास्थळावरून पळ काढला. मात्र, तो थेट कार घेऊन सिडको पोलीस ठाण्यात पोहोचला आणि पोलिसांसमोर स्वतःहून हजर झाला. भरदिवसा घडलेल्या या निर्घृण हत्याकांडामुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, सिडको परिसरात प्रचंड दहशत पसरली आहे.

अधिकृत तक्रार द्यावी, सरकार निष्पक्ष चौकशी करेल

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, एकनाथ शिंदेंनी 500 कोटींवर आधीच उत्तर दिलंय!



■ नागपूर (दै. संध्या)

"मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी जाहीर केलेल्या कथित 500 कोटी रुपयांच्या ऑडिओ क्लिपबाबत आणि त्यांना अडकवण्याच्या षड्यंत्राबाबत जर त्यांच्याकडे ठोस पुरावे असतील, तर त्यांनी केवळ माध्यमांत बोलण्यापेक्षा पोलीस ठाणे किंवा जिल्हाधिकाऱ्यांकडे अधिकृत तक्रार नोंदवावी. सरकारकडे रीतसर तक्रार आल्यानंतर मुख्यमंत्री आणि गृह खाते संबंधित यंत्रणांमार्फत त्याची निष्पक्ष व सखोल चौकशी करेल. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यापूर्वीच जाहीर सभेत स्पष्ट केले आहे की त्यांनी कोणालाही पैसे दिले नाहीत आणि घेतलेही नाहीत," अशी रोखठोक भूमिका महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मांडली आहे. नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या दौऱ्यादरम्यान माध्यमांशी संवाद साधताना बावनकुळे यांनी जरांगेंच्या ऑडिओ क्लिपवर स्पष्टीकरण देण्यासोबतच जमिनीच्या सामायिक सातबाऱ्यावरील दस्तनोंदणीबाबत घेतलेला ऐतिहासिक निर्णय, मनसे प्रमुख राज ठाकरे यांचे 'रेझिम चेंज'चे भाकीत आणि संजय राऊत यांच्या विधानांवर सडकून टीका केली. मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषदेत ऐकवलेल्या 500 कोटींच्या कथित ऑडिओ क्लिपवर बोलताना बावनकुळे म्हणाले, "उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कालच जाहीर सभेत आपली भूमिका मांडली असून कोणाशीही अशा प्रकारचा आर्थिक व्यवहार झाला नसल्याचे स्पष्ट केले आहे. जर जरांगे पाटलांना असे वाटत असेल की हे आंदोलन बदनाम करण्यासाठी किंवा त्यांना अडकवण्यासाठी कट रचला जात आहे, तर त्यांनी रीतसर तक्रार द्यावी. तक्रार कुठल्या पोलीस ठाण्यात किंवा यंत्रणेकडे गेली आहे हे तपासून शासन पुढील कारवाई करेल." राज्यातील जमिनींच्या खरेदी-विक्री व्यवहारांमधील पारदर्शकतेवर बोलताना महसूलमंत्र्यांनी मोठा प्रशासकीय निर्णय जाहीर केला. "पूर्वी एका सातबाऱ्यावर 4 नावे असली तरी एक व्यक्ती परस्पर जमीन विकून मोकळा व्हायचा. खरेदीदार प्रत्यक्ष जागेवर गेल्यावर ताब्यावरून मोठे वाद निर्माण होऊन शेकडो दिवाणी खटले न्यायालयात दाखल व्हायचे. यावर शेतकऱ्यांची आणि जनतेची मागणी लक्षात घेऊन सरकारने आता सामायिक शेतीची अधिकृत मोजणी आणि विभागणी झाल्याशिवाय दस्तनोंदणी (रजिस्ट्रेशन) न करण्याचा कठोर निर्णय घेतला आहे." "तुकडेबंदी कायदा रद्द झालेला असला तरी शेतजमिनीसाठी 40 हजार चौरस फूट म्हणजे किमान 1 एकराचा नियम पाळावाच लागेल. त्यापेक्षा कमी तुकडा विकायचा असेल, तर तो भूखंड अधिकृतपणे रहिवासी (रेसिडेन्शियल) करून घेऊनच नियमानुसार विक्री करता येईल."

सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न

"आम्हाला मारून टाकतील, आम्ही कसे जगायचे, अशी वक्तव्ये करून जरांगे केवळ सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांच्या बोलण्यावर मला फार भाष्य करायचे नाही, तक्रार आल्यावर चौकशीत काय ते सत्य समोर येईलच."

राज ठाकरेंचे भाकीत म्हणजे दिवाळीतला फटाका

राज ठाकरे यांनी 'पुढील 3 ते 4 महिन्यांत देशात सत्तापालट होईल' असा दावा केला होता, त्याचा समाचार घेताना बावनकुळे म्हणाले, "दिवाळी जवळ आली की फटाके फुटतात, राज ठाकरेंचे वक्तव्य हा देखील असाच एक राजकीय फटाका आहे. कोणीही उठून 4 महिन्यांत सत्ता बदलेल असे म्हणू शकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानानुसार जनतेने मतदान करून नरेंद्र मोदींना केंद्रात आणि महायुतीला राज्यात 5 वर्षांसाठी स्पष्ट कौल दिला आहे. हा काही इटली, फ्रान्स किंवा बांगलादेश नाही; भारताचे संविधान अत्यंत कणखर आहे."

माझ्याविरोधात बोलणाऱ्यांना भाजपने पार्टी फंड पुरवला!

मनोज जरांगेंकडून ५०० कोटींच्या दाव्याची स्फोटक ऑडिओ क्लिप जाहीर; शिंदे-फडणवीसांना षड्यंत्र थांबवण्याचा इशारा

■ छत्रपती संभाजीनगर (दै. संध्या)

"गेल्या 3 वर्षांपासून मराठा आरक्षण आंदोलन मोडून काढण्यासाठी आणि गरीब मराठ्यांच्या लेकरांचे हक्क संपवण्यासाठी सत्ताधाऱ्यांकडून अत्यंत भयंकर व गलिच्छ षड्यंत्र रचले जात आहे. माझ्याच समाजातील काही पोरांना हाताशी धरून, त्यांना भाजपचा पार्टी फंड, उद्योगपतींचा पैसा, मोर्चे आणि गाड्यांचा खर्च पुरवून माझ्याविरोधात रान उठवले गेले. 'बाप दाखवा नाहीतर श्राद्ध घाला' म्हणणाऱ्या सत्ताधाऱ्यांचे वस्त्रहरण करणारा 32 मिनिटांचा पुरावा आज मी अखंड महाराष्ट्रासमोर ठेवला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी हे षड्यंत्र तत्काळ थांबवले नाही, तर 1 ते 2 महिन्यांत असा बॉम्ब टाकेन की या राज्यात 2029 ला एकालाही तोंड दाखवायला किंवा पाय ठेवायला जागा उरणार नाही," असा इशारा मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे.

तब्बल 1 तास 12 मिनिटांच्या प्रदीर्घ पत्रकार परिषदेत जरांगे पाटील यांनी भाजप व सत्ताधारी महायुतीतील अंतर्गत रणनीतीकारांची एक



गुप्त ऑडिओ क्लिप ऐकवली. (या ऑडिओ क्लिपच्या सत्यतेची पुष्टी दै. संध्या करत नाही.) यामध्ये 500 कोटींचा दावा, दरेकर-डावखरे यांचे कनेक्शन, सोशल मीडिया नॅरेटिव्ह आणि जरांगे यांच्याविरोधात मराठा नेत्यांना रसद पुरवण्याचा कट उघडकीस आणल्याचा दावा त्यांनी केला. पत्रकार परिषदेत ऐकवलेल्या ऑडिओ क्लिपमधील संभाषणाचा दाखला देत जरांगे पाटील म्हणाले,"या क्लिपमध्ये स्पष्ट दिसते की पक्षाचा फंड नसेल तर वैयक्तिक फंड वापरा, गाड्यांचा आणि मोर्चांचा खर्च द्या, पण जरांगेंना डॅमेज करा. प्रवीण दरेकर आणि निरंजन डावखरे यांच्याकडे मराठ्यांची पोरं जोडून दिली गेली. जरांगेंच्या विरोधात बोलणाऱ्या मराठा अभ्यासक, प्रवक्ते आणि समन्वयकांना मुंबई-पुण्यात पत्रकार परिषदांसाठी जागा आणि रसद कोण पुरवते, हे आता सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ झाले आहे." "छत्रपती शिवरायांचा विचार सांगणाऱ्यांनी आधी आत्मपरीक्षण करावे. ज्यांच्या घरामध्ये गरिबी आहे, अशा 6 कोटी मराठा समाजाच्या मुलाबाळांच्या शिक्षणासाठी आणि नोकरीसाठी आम्ही रक्त जाळतोय. मात्र, सत्ता टिकवण्यासाठी आमच्याच पोरांना पैसे देऊन आमच्याच विरोधात नाचवले जात आहे. मराठ्यांच्या पोरांनी आता जागे व्हावे, तात्पुरत्या पैशासाठी आपल्याच जातीच्या अस्तित्वावर कुऱ्हाड चालवू नका."पत्रकार परिषदेत जरांगे यांनी ऐकवलेल्या ऑडिओ क्लिपमध्ये भाजप आणि महायुतीच्या अंतर्गत रणनीतीकारांची गंभीर चर्चा उघड झाली आहे. भाजपचे मराठा चेहरे पुढे करा: क्लिपमधील चर्चेनुसार, "जरांगे भाजपला 'मराठाद्रोही' ठरवत आहेत आणि त्याचा प्रभाव समाजात पडत आहे. त्यामुळे शिवेंद्रराजे भोसले यांचा व्हिडिओ केला, तसाच मुद्दा घेऊन खासदार उदयनराजे भोसले किंवा अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षांना (नरेंद्र पाटील) बोलते केले पाहिजे. प्रवीण दरेकर किंवा नारायण राणे यांच्या बोलण्यापेक्षा या मराठा चेहऱ्यांनी समोर येऊन जरांगेंना उत्तर दिले पाहिजे."

वैयक्तिक फंड आणि गाड्यांचा खर्च: "पार्टीचा फंड वापरायचा नसेल, तर वैयक्तिक लोकांनी स्वतःचा फंड वापरावा. जरांगेंच्या विरोधात बोलणाऱ्यांना प्रपोजल द्यावे, त्यांच्या गाड्यांचा आणि मोर्चांचा खर्च उचलावा. निरंजन डावखरे आले होते, तेव्हा जरांगेंच्या विरोधातील 2 ते 4 लोकांशी त्यांचे बोलणे करून दिले आहे. एक वेगळा गट प्रवीण दरेकरांशी जोडून दिला आहे."

क्लिपमध्ये एका महिलेचा आवाज स्पष्टपणे ऐकू येतो, "जरांगे पाटील को ऑलरेडी 500 करोड रुपये श्रीकांत शिंदे के पास से पहुंच चुके हैं... अब जरांगे पाटील विधानसभा चुनाव में हमारे फायदे का रहेगा या नहीं, इसमें मेरा मत अलग है, कॅल्क्युलेशन अलग है... बाकी आप लोग जो सोचते हैं..." यावरून विधानसभा निवडणुकीत जरांगेंच्या भूमिकेचा राजकीय फायदा-तोटा कसा मोजला जात होता, हे समोर आले आहे.

३२ मिनिटांची क्लिप आणि ५०० कोटींची बदनामी

500 कोटी रुपयांच्या कथित गैरव्यवहारावर आणि बदनामीवर बोलताना जरांगेंनी थेट एकनाथ शिंदेंना घेरले. "या क्लिपमध्ये एक महिला उघडपणे बोलते की 'जरांगे पाटील को ऑलरेडी 500 करोड रुपये श्रीकांत शिंदे के पास से पहुंच चुके हैं'. मी एक रुपया कोणाकडून घेतला नाही आणि दिलाही नाही. मग ही बदनामी कोणी सुरू केली? शिंदे साहेबांनी स्वतः भाजपच्या केंद्रीय आणि राज्यातील नेत्यांना सांगितले नसते, तर या लोकांची हिंमत झाली असती का? तुम्हीच ही हवा पसरवली आणि आता पुरावे मागता."

संपादकीय

सहकारी साखर कारखाने टिकले पाहिजे

साखर कारखानदारी हा राज्यातील प्रमुख कृषी प्रक्रिया उद्योग आहे, राज्यात जवळपास २०० हून अधिक सहकारी व खाजगी कारखाने आहेत, ग्रामीण भागात मोठा रोजगार या साखर कारखानदारांनी दिलेला आहे, व देत आहे,लाखो शेतकरी, कामगार, ऊस तोडणी कामगार, वाहतूकदार, व्यावसायिक यांचे हितसंबंध साखर कारखानदारीशी आहेत, एकूणच ग्रामीण अर्थकारणाशी निगडित हा विषय आहे, त्यामुळे सध्या अडचणीत सापडलेल्या साखर उद्योगाला सावरण्याची नितांत गरज आहे,राज्य सरकारने राज्यातील साखर आयुक्त,सहकार विभाग, आणि राज्य सहकारी बँकेचे एकत्रित मॉडेल तयार करण्याचा निर्णय घेतला असून त्याबाबत अहवाल एका महिन्यात शासनास सादर केला जाणार आहे, वास्तविक सदरच्या समितीमध्ये व्हीएसआय, इस्मा, राज्य साखर संघ, शेतकरी व कामगार संघटनेच्या प्रतिनिधींचाही समावेश करणे गरजेचे आहे असे वाटते, विशेषता सहकारी साखर कारखाने आर्थिक अरिष्टात अडकलेले आहेत, त्याची कारणे यानिमित्ताने माहीती होणे आवश्यक आहे, अनेक साखर कारखान्यांनी ऊस उपलब्धतेचा विचार न करता मागील काळात गाळपक्षमता वाढवलेली आहे, यांना परवानगी देताना साखर आयुक्त यांनीही राजकीय कारणामुळे दुर्लक्ष केलेले दिसत आहे, यामुळे हंगाम १८० दिवसावरून तो ९० दिवसांवर कधी आला? हे साखर उद्योगाला समजलेच नाही, कारखाने कमी दिवस चालल्यामुळे उर्वरित काळात त्याची उत्पादन क्षमता वापरात येत नाही, त्यामुळे कारखान्यांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड करणे कठीण होत असून हा उद्योग आर्थिक संकटात सापडलेला आहे, परिणामी सहकारी साखर कारखाने अडचणीत येण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, या पार्श्वभूमीवर साखर, व शेती तज्ञाच्या काही विधायक सूचना व उपायोजना याचा विचार होणे आवश्यक आहे असे वाटते, साखर उद्योग हा एकमेव उद्योग असा आहे की ज्याला अंतिम उत्पादनापेक्षा कच्च्या मालाला अधिक भाव द्यावा लागतो, साखरेची एमएसपी २०१६ पासून ३१०० प्रतिक्विंटल तर. उसाची एफ आर पी सरासरी ३८०० रुपये प्रति टन असे व्यस्त प्रमाण आहे, साखरेची एमएसपी हे कारखानदारी तोट्यात जाण्याचे मुख्य कारण आहे,त्याकरीता साखरेच्या दरासाठी उसाच्या एफआरपीसी निगडित सूत्र ठरले पाहिजे.सद्या ऊस दराचा विचार करता उसाची एफ आर पी अधिक २५टक्के असे सूत्र साखरदरासाठी निश्चित करणे सोयीचे होईल. याप्रमाणे इथेनॉल साठी ही दर निश्चित केले पाहिजेत, इथेनॉल हे पेट्रोलमध्ये मिश्रीत करून इंधन म्हणून वापरले जाते, त्याचा विचार करता इथेनॉलचे दर पेट्रोल दराशी निगडित असावेत, ही कारखानदाराची मागणी रास्त आहे, याचा विचार करता इथेनॉलच्या दरासाठी पेट्रोलच्या दराच्या ७५ टक्के असे सूत्र निश्चित करावे, म्हणजे याचा अर्थ पेट्रोलचा दर प्रति लिटर शंभर रुपये असेल तर इथेनॉलला प्रति लिटर ७५ रुपये मिळणे आवश्यक आहे, यामुळे कारखान्याचे अर्थकारण सुधारून ऊस उत्पादकांना ही आर्थिक लाभ मिळेल, ऊस तोडणीचा दर हा राज्यभर समान असतो,तरी ऊस वाहतूक दरात मात्र कारखाना निहाय मोठी तफावत आढळते, यात अनेक कारखानदार घोटाळे करतात असे निदर्शनास आलेले आहे, ऊस तोडणी व वाहतूक दर ऊसाच्या एफआरपी मधून वजा होऊन उर्वरित रक्कम उसाचे निव्वळ मूल्य म्हणून शेतकऱ्यांना मिळते, याचा विचार करता ऊस वाहतुकीचे प्रति किलोमीटर दरही शासनाने निश्चित करावेत, निश्चित दरात जास्तीत जास्त २५टक्के वाढ, भौगोलिक स्थिती, पेट्रोल डिझेल दरवाढ,गृहीत धरून मान्य करावी, त्यामुळे ऊस वाहतूक दरात सुसूत्रता आणि समानता येईल, राज्य सहकारी बँक,आणि जिल्हा सहकारी बँका या साखरेच्या एसएमपीच्या ८५ टक्के नगदमूल्य निश्चित करून कर्ज पुरवठा करतात,सद्यस्थितीत ३१०० एम एम. पी. गृहीत धरून याच्या ८५ टक्के मालतारण कर्ज दिले जाते, यामुळे कारखान्यांना एफआरपी देण्यासाठी अन्य मार्गाने कर्ज काढावे लागते, ही मोठी समस्या असल्याने कारखाने तोट्यात जातात, व कर्जबाजारी होतात, यासाठी साखरेच्या दराबाबत गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे, यासाठी आणखी एक महत्त्वाचा मुद्दा यावर वेगळी चर्चा होते, पण प्रत्यक्षात करणे होत नाही, ती म्हणजे साखरेच्या द्विस्तरीय दराची. मानवी वापरा व्यतिरिक्त साखरेचा मिठाई, हॉटेल, शीतपेये, आईस्क्रीम, कन्फेशनरी, चॉकलेट्स, गोळ्या, फार्मसी,यासह अनेक उद्योग व्यवसायात मोठ्या प्रमाणात वापर होतो, हे व्यापारी, उद्योजक स्वस्त दरात साखर खरेदी करून प्रचंड नफेखोरी केली जाते,अशा उद्योग वापरासाठीच्या साखरचे दर हे मानवी वापरायचे साखरदरापेक्षा दुप्पट निश्चित करावे, त्यावर निश्चित केलेल्या दराने साखर खरेदी करणे बंधनकारक करावे, यासाठी काय उपाययोजना करता येतील. याचा शासनाने विचार करावा, कारखानदार उसाची उपलब्धता विचारात न घेता अनावश्यक गाळप क्षमतेची वाढ करतात, उपनिर्मिती प्रकल्प, यासाठी कर्ज काढतात, सदरचे प्रकल्प अपु-या ऊस उपलब्धतेमुळे तोट्यात जाऊन ते कारखाने हाकतात, व कर्जबाजारी होतात, राज्याचा विचार करता कारखान्यावर प्रतिवर्षी सरासरी ५०कोटी रुपये व्याजाचा बोजा पडतो, यासाठी राजकीय हितसंबंध, व ऊस उपलब्धता बघूनच कर्ज पुरवठा केला जावा, अनावश्यक कर्जावर निर्बंध घालावे, कर्जावरील व्याज दराचा विषय जो अत्यंत कळीचा मुद्दा आहे. साखर उद्योग हा कृषी प्रक्रिया उद्योग असल्याने या उद्योगात सवलतीच्या दराने कर्ज पुरवठा केला पाहिजे, सध्या तारण कर्जाला साधारण १२. ८५ टक्के,तर भांडवली कर्जासाठी १३ टक्के व्याजदर आहे, साखर कारखान्यांना तारण कर्ज पाच टक्के तर अल्प कर्ज ७ टक्के अशा सवलतीच्या दराने कर्जपुरवठा झाला तर कारखान्याला नव संजीवनी मिळेल, त्यामुळे कारखान्यांना आर्थिक दिलासा मिळेल,सध्या राज्यातील क्षेत्र सुमारे १५ लाख हेक्टर पर्यंत मर्यादित आहे, कारखान्याची वाढती क्षमता आणि वाढवलेली गाळप क्षमता, याचा विचार करता ऊस क्षेत्रात वाढ होणे आवश्यक आहे, यासाठी ऊस उत्पादकता वाढविणे सूक्ष्म मिश्रणाचा विस्तार करणे, आणि ऊस विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबविणे आवश्यक ठरते, या कामात साखर कारखान्याच्या जोडीने शासनाच्या कृषी व जलसंधारण विभागाना सहभागी करून कालबध्द दूरगामी,योजना राबवल्यास त्याचा फायदा ऊस उत्पादक आणि साखर उद्योगाला होईल, काळ कसोटीचा आणि साखर कारखानदारीच्या अस्तित्वाचा आहे, यामुळे अशा बिकट परिस्थितीत विसंवाद आणि पक्षीय गटबाजीचे राजकारणा ऐवजी सुसंवादाची गरज आहे, कारण कारखाने टिकले तरच.... राजकारण, सत्ताकारण, समाजकारण असेल तरच ते टिकेल,सत्ता कारण व राजकीय संबंधापेक्षा आज शेतकरी, कामगार, ऊस तोडणी मजूर, वाहतूकदार, व्यावसायिक, व्यापारी, यांचेही संरक्षण करणे महत्त्वाचे आहे, या सर्वांचा विचार साखर कारखानदाराशी निगडित संबंधित घटकांनी करावा, तसेच शासन युक्त प्रतिनिधी किंवा समितीने साखर कारखानदारी संबधित सर्व घटकाचे संवाद साधून समन्वयाने दीर्घकालीन सक्षम मॉडेल तयार करावे, आणि सहकारी साखर कारखान्याना संकटातून बाहेर काढावे, तरच ग्रामीण महाराष्ट्र टिकेल, अन्यथा ग्रामीण महाराष्ट्रातील शेतकरी. कामगार, मजूर पुण्या मुंबईकडे धावण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

अपघात रोखण्यासाठी विशेष उपाययोजना

साखर कारखान्यांच्या ऊस वाहतुकीसाठी आरटीओचे सुरक्षा नियम

■ बारामती (दै. संध्या)

साखर कारखान्यांच्या गळीत हंगामादरम्यान ऊस वाहतूक करताना होणारे अपघात रोखण्यासाठी बारामती उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आरटीओ) वतीने विशेष उपाययोजना करण्याच्या सूचना उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम यांनी बारामती येथे आयोजित बैठकीत दिल्या.

या बैठकीला बारामती कार्यक्षेत्रातील विविध साखर कारखान्यांचे शेती अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते. सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल गावडे, अनिल शेलार उपस्थित होते. ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांनी वाहनाची सर्व वैध कागदपत्रे सोबत ठेवावीत, तसेच वाहनामध्ये प्रमाणापेक्षा जास्त ऊस भरू नये. वाहनाच्या पाठीमागील भागाला रिफ्लेक्टिव्ह टेप आणि रिफ्लेक्टिव्ह पट्टी लावून ती लाल रंगाची असावी. ट्रॅक्टरद्वारे ऊस वाहतूक करताना वाहनाचा वेग मर्यादित ठेवावा आणि वाहतुकीच्या सर्व नियमांचे काटेकोर पालन करावे.

ऊस वाहतूक बहुतांश वेळा रात्री होत असल्याने वाहनचालकांनी मद्यप्राशन करून वाहन चालवू नये. तसेच वाहनांमध्ये मोठ्या आवाजात स्पीकर लावू नयेत, अशा सूचनाही देण्यात आल्या. या सर्व नियमांची तपासणी संबंधित साखर कारखान्यांच्या एन्ट्री गेटवर करण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले. साखर कारखाना संचालक मंडळांनी ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनचालकांसाठी रस्ता सुरक्षा, वाहतुकीदरम्यान घ्यावयाची काळजी आणि अपघात प्रतिबंधक उपाययोजनांबाबत प्रबोधनात्मक शिबिरांचे आयोजन करून मार्गदर्शन करावे, असे आवाहन श्री. निकम यांनी केले. सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यातील तरतुदींनुसार वायुवेग पथकामार्फत कारवाई करण्यात येईल, असा इशाराही परिवहन विभागाने दिला.



या बैठकीस दौंड शुगर, भीमा शुगर, कर्मयोगी शुगर, बारामती ॲग्रो, सोमेश्वर साखर कारखाना, माळेगाव साखर कारखाना आणि छत्रपती साखर कारखान्यांचे शेती अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते. ऊस वाहतूक सुरक्षित, अपघातमुक्त आणि नियमबद्ध करण्यासाठी साखर कारखाने, वाहनचालक आणि परिवहन विभाग यांनी समन्वयाने काम करावे, असेही श्री. निकम यांनी सांगितले.

दोन बंद घरातील घरफोडीत चोरट्यांकडून नऊ लाखाचा ऐवज लंपास

■ राजगुरुनगर (दै. संध्या)



राजगुरुनगर शहरातील राक्षेवाडी येथील शिक्षक कॉलनी परिसरात चोरट्यांनी एकाच रात्री दोन घरांचे दरवाजे तोडून तब्बल ८ लाख ९० हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. मंगळवारी (ता. २०) रात्री देवीच्या मूर्ती विसर्जनासाठी घरातील माणसे बाहेर गेल्याची संधी साधून चोरट्यांनी बुधवारी पहाटे साडेतीन ते चारच्या सुमारास ही घरफोडी केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राक्षेवाडी येथील शिक्षक कॉलनीत राहणारे महेंद्र दिनकर गिरीगोसावी (वय ३५) हे कुटुंबासह देवी विसर्जनासाठी बाहेर गेले होते. या वेळी चोरट्यांनी त्यांच्या घराच्या मुख्य दरवाजाची कडी व लॅचचा भाग तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर कपाटाची तोडफोड करून नवीन वाहन खरेदीसाठी ठेवलेली ४ लाख ३५ हजार रुपयांची रोकड लंपास केली. तसेच एक तोळा वजनाची सोनसाखळी आणि पाच ग्रॅम वजनाची सोन्याची कंठमाळही चोरून नेली. त्यानंतर चोरट्यांनी याच परिसरातील हौशीराम दगडू कुटे यांच्या घरालाही लक्ष्य केले.आत घराचा मुख्य दरवाजा तोडून शिरलेल्या चोरट्यांनी हॉलमधील लाकडी व लोखंडी कपाट फोडले. त्यातील अंदाजे ३ लाख ५० हजार रुपयांची रोकड घेऊन चोरटे पसार झाले. घरफोडीचा प्रकार उघडकीस आल्यानंतर महेंद्र गिरीगोसावी यांनी खेड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. एकाच परिसरातील दोन घरांचे दरवाजे तोडून रोकड आणि सोन्याचे दागिने चोरीला गेल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे

बारामती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात विविध जनजागृतीपर उपक्रम

■ बारामती (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, बारामती यांच्या वतीने दि. १७ सप्टेंबर २०२६ ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत विविध आरोग्यविषयक जनजागृतीपर व सामाजिक उपक्रमांचे अधिष्ठाता डॉ. अंजली पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले.



महिलांमध्ये वैयक्तिक स्वच्छता, आरोग्याची काळजी, नियमित आरोग्य तपासणी आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात आले. स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र विभागाच्या वतीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचा एकूण ४८५ महिलांनी लाभ घेतला. अवयवदानाचे महत्त्व, अवयवदानाची प्रक्रिया, सामाजिक गैरसमज आणि अवयवदानामुळे रुग्णांना मिळणारे नवजीवन याबाबत जनजागृती करण्यात आली. वैद्यकीय व नर्सिंग विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान, रांगोळी प्रदर्शन, प्रश्नमंजुषा, पोस्टर स्पर्धा आणि 'Why Be an Organ Donor?' या विषयावरील पथनाट्य आयोजित करण्यात आले. विविध उपक्रमांतून अवयवदानाचा सकारात्मक संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आला.

या अभियानाचा एकूण २४० लाभार्थ्यांना लाभ झाला. भूलशास्त्र विभागप्रमुख डॉ. भालेराव व सहयोगी प्राध्यापक डॉ. जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

दिव्यांग व्यक्तींना आवश्यक वैद्यकीय सहाय्य व शासकीय सुविधांचा लाभ घेण्यासाठी मदत करण्याच्या उद्देशाने दिव्यांग प्रमाणपत्र वाटप शिबिर आयोजित करण्यात आले. वैद्यकीय अधीक्षक कार्यालयाच्या वतीने पात्र लाभार्थ्यांच्या प्रमाणपत्रासंबंधी आवश्यक कार्यवाही करून प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचा एकूण ९४ दिव्यांग लाभार्थ्यांना लाभ झाला. वैद्यकीय अधीक्षक डॉ. उमाप व सहयोगी प्राध्यापक डॉ. पांढरे यांच्या सहकार्याने शिबिराचे कामकाज पार पाडण्यात आले.

या उपक्रमांद्वारे आरोग्यविषयक जागरूकता वाढविणे, गरजू व्यक्तींपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचविणे आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे यावर भर देण्यात आला. नोडल अधिकारी डॉ. राजेश लकडे यांच्या समन्वयातून राबविण्यात आलेल्या या अभियानामुळे आरोग्यसेवा, जनजागृती आणि समाजसेवेच्या मूल्यांना प्रोत्साहन मिळाले.

कळंब येथे नवरात्रोत्सवादरम्यान नियमांचे उल्लंघन

परवानगीशिवाय डीजे लावून मिरवणूक काढणाऱ्या मंडळाच्या पदाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल

■ वालचंदनगर पोलिसांची कारवाई
■ मंडळाच्या अध्यक्षांसह सदस्यांवर कारवाई

■ वालचंदनगर (दै. संध्या)



नवरात्रोत्सवाच्या काळात परवानगीशिवाय डीजे लावून मिरवणूक काढल्याप्रकरणी कळंब ता. इंदापूर येथील दुर्गा माता प्रतिष्ठान मंडळाच्या पदाधिकाऱ्यांसह सदस्यांवर वालचंदनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी मंडळाचे अध्यक्ष जावेद हुसेन सय्यद यांच्यासह इतर ४ सदस्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कळंब गावातील नवरात्र दुर्गादेवीच्या बेकायदेशीर मिरवणुकीसाठी डीजेचा वापर करून मोठ्या प्रमाणात आवाज सोडल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. दुर्गा माता प्रतिष्ठान कळंब या मंडळातील अध्यक्ष व सदस्यांनी शासनाची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता डीजे लावून मिरवणूक काढल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणात मंडळाचे अध्यक्ष जावेद हुसेन सय्यद (रा. कळंब, ता. इंदापूर, जि. पुणे) यांच्यासह इतर ४ सदस्य तसेच डीजे मालक नामे सतीश जालिंदर माने (रा. शिरसठवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे) व डीजे ऑपरेटर नामे सागर सुदाळ कोळी (रा. शिरसठवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे) यांनी मा. जिल्हाधिकारी, पुणे यांच्या आदेशाचा अवमान करून सार्वजनिक शांतता व सभ्यतेचा भंग केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी वालचंदनगर पोलीस स्टेशनचे पोलीस अंमलदार गणेश वानकर यांनी लेखी फिर्याद दिल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच अशा प्रकारच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी डीजे व डीजेचे वाहन जप्त करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार विकास निर्मळ व वालचंदनगर पोलीस स्टेशनचे पथक करीत आहे.

मुलींच्या संघाला सर्वसाधारण विजेतेपद !



■ बारामती (दै. संध्या)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती आणि साहेबराव शंकरराव ढमढेरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळेगाव ढमढेरे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ४६ वी आंतरमहाविद्यालयीन मैदानी स्पर्धा २०२६-२७ मध्ये ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या शारदाबाई पवार महिला आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करत सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या खेळाडूंनी विविध मैदानी क्रीडा प्रकारांत उल्लेखनीय कामगिरी करत विजेतेपद पटकावले. स्पर्धेत गोळाफेक या क्रीडा प्रकारात कु. तेजश्री खंडागळे हिने सुवर्णपदक, तर भालाफेक प्रकारात कु. स्नेहल वाघमारे हिने सुवर्णपदक पटकावले. ४ × ४०० मीटर रिले स्पर्धेत कु. गौरी रणदिवे, कु. तेजल आटोळे, कु. स्नेहल वाघमारे, कु. पूजा बोडके आणि कु. संध्या शिंदे यांच्या संघाने सुवर्णपदक मिळवले.तर ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत कु. गौरी रणदिवे हिने रौप्यपदक मिळवले.

पाठ्यपुस्तकातील कवी प्रत्यक्ष भेटीला

■ काळदरी (दै. संध्या)



आपल्या आजूबाजूला जे घडते ते मनात साचते आणि अचानक त्याला शब्दरूप मिळून त्याची कविता होते. अशा प्रकारे एखादा कवी किंवा लेखक प्रत्येकाच्या मनातील विचारांना कल्पनेतून साकारतो आणि आपल्यासमोर कवितेच्या रूपात ती भावना येते. पाठ्यपुस्तकांतून आपण अशा अनेक कविता अभ्यासतो. पाठ्यपुस्कात कविता असणारा कवी प्रत्यक्षात भेटला तर...ही कल्पना विद्यालयाचे प्राचार्य पांडुरंग दुर्गाडि यांच्या मार्गदर्शनाखाली श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित श्री केदारेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, काळदरी या विद्यालयात प्रत्यक्षात उतरली. 'पाठ्यपुस्तकातील कवी मुलांच्या भेटीला' या उपक्रमाअंतर्गत कवी हनुमंत चांदगुडे हे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष भेटले. काळदरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पहिली ते चौथी आणि श्री केदारेश्वर विद्यालयातील इयत्ता पाचवी ते बारावीतील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उत्सुकता आणि कुतुहल जाणवत होते. इयत्ता आठवीच्या मराठीच्या अभ्यासक्रमातील 'आळाशी' या कवितेचे कवी हनुमंत चांदगुडे विद्यार्थ्यांच्या भेटीला आले आणि पाठ्यपुस्तकातील कवितेच्या कवीला प्रत्यक्ष समोर पाहून विद्यार्थ्यांचे चेहरे आनंदाने फुलून गेले होते. सासवड येथील कवी मा श्री अनिल कदम सर यांनीही या उपक्रमात सहभाग घेतला. हा संपूर्ण कार्यक्रम मुलांनी अतिशय कुतुहलाने आणि उत्सुकतेने ऐकला. कवी आणि गीतकार चांदगुडे यांच्या 'वासरु', 'अवती भवती मळ्यात','सवाल जवाब','लेक' आणि काही विनोदी कविता सादर केल्या. या वेळी मुले अक्षरश: कवितेच्या विश्वात रमून गेली होती. चांदगुडे यांनी त्यांच्या 'आळाशी' या कवितेचे अतिशय सुंदररित्या रसग्रहण केले. आळाशी या कवितेचा जन्म कसा झाला याचेही अतिशय मार्मिक भाषेत वर्णन केले त्यावेळी विद्यार्थ्यांनाही अश्रू अनावर झाले. आडतास ही कविता ऐकल्यावर विद्यार्थ्यांनी हशा... टाळ्यांची बरसात केली. सासवड येथील कवी अनिल कदम यांनीही 'समेवर येताना' या स्वतःच्या कवितासंग्रहातील 'माझे दैव दावणीत' या कवितेचे सादरीकरण करीत बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. विद्यालयाचे माजी विद्यार्थी प्रमोद कारकर यांनी या दोन्ही कार्यक्रमांचे नियोजन केले होते. यावेळी माजी ग्रामसेवक रामभाऊ चांदगुडे, ग्रामपंचायत काळदरीचे आदर्श माजी सरपंच अंकुश परखंडे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ रुपाली कुंजीर, सहशिक्षिका सौ शैला जाधव, माजी प्राचार्य नरहरी देव, माणिक शेलार, प्रकाश कारकर आदी उपस्थित होते. काळदरी विद्यालयाचे उपक्रमशील प्रा संतोष नवले, सुनील घोडके, संजय भिंताडे, बाळू पोमणे, शिवाजी गोडसे, पंडित चेंडके, सौ सुनंदा टकले, सौ कविता शेलार, पांडुरंग जाधव, अशोक भगत व संतोष दोडके यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

खासगी बसचा प्रवास २०-२५ टक्क्यांनी महागणार

राजन जुनवणे यांची माहिती; पुणे बस अँड कार ओनर्स असोसिएशनकडून दरवाढीचा निर्णय

■ पुणे (दै. संध्या)



गाड्यांच्या किंमतीत जवळपास दुपटीने झालेली वाढ, डिझेलसह टायर, बॅटरी, स्पेअर पार्ट्स व अन्य आवश्यक गोष्टींच्या वाढलेल्या किंमती, टोल व करांमध्ये झालेली वाढ यामुळे नाईलाजाने बस आणि कारच्या भाडेदरात २० ते २५ टक्क्यांपर्यंत वाढ करण्यात आली आहे, अशी माहिती पुणे बस अँड कार ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष राजन जुनवणे यांनी पत्रकार परिषदेत दिली. पत्रकार भवनात झालेल्या पत्रकार परिषदेवेळी उपाध्यक्ष सुनील मोरे, सचिव तुषार जगताप, खजिनदार दिनेश सोनावणे, किरण देसाई, सचिन पंचमुख आदी उपस्थित होते. शालेय बसवाहतुकीची दरवाढ परिवहन विभागाकडे प्रस्तावित करण्यात आली असून, येत्या शैक्षणिक वर्षापासून ही नवी दरवाढ लागू होईल, असे त्यांनी यावेळी सांगितले. राजन जुनवणे म्हणाले, "प्रवासी वाहतूक क्षेत्रात कार्यरत असलेली पुणे बस अँड कार ओनर्स असोसिएशन ही पुणे शहरातील एक महत्त्वाची संघटना असून, आमच्या संघटनेचे सुमारे १४०० सभासद आहेत. संघटनेच्या माध्यमातून प्रासंगिक करारावर चालणाऱ्या प्रवासी बसेस, विद्यालय व महाविद्यालयांच्या शैक्षणिक सहली, लग्न समारंभ व धार्मिक यात्रांसाठीच्या बसेस, शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या स्कूल बसेस तसेच पुणे शहर व परिसरातील विविध कंपन्यांच्या कर्मचारी वाहतूक करणाऱ्या स्टाफ बसेस अशा विविध प्रकारच्या प्रवासी वाहतूक सेवांशी संबंधित सभासद कार्यरत आहेत." "मागील पाच वर्षांच्या कालावधीत या बस वाहतूक दरामध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. मात्र, या कालावधीत वाहनांच्या किमती, टायर्स, स्पेअर पार्ट्स, देखभाल-दुरुस्ती, चालकांचे वेतन व भत्ते, विमा, इंधन तसेच विविध शासकीय नियम व तांत्रिक बाबींशी संबंधित खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे सध्याच्या दरामध्ये प्रवासी वाहतूक सेवा देणे बस मालकांसाठी आर्थिकदृष्ट्या अत्यंत आव्हानात्मक झाले असून, दरवाढ करणे आता अपरिहार्य झाले आहे. वाहतूक क्षेत्रालाही महागाईचा मोठा फटका बसत आहे. त्यामुळेच पुणे बस अँड कार ओनर्स असोसिएशनकडून दरवाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या दरवाढीमध्ये प्रामुख्याने १३ सीटर ते ४९ सीटर बस, स्कुल बस, स्टाफ बस व टुरिस्ट बस याचा समावेश आहे," असेही जुनवणे यांनी नमूद केले. किरण देसाई म्हणाले, "याआधीची दरवाढ २०२१ मध्ये करण्यात आली होती. परिवहन मंत्र्यांनी बाकीच्या प्रवासी वाहतुकीला वाऱ्यावर सोडले आहे. फक्त एसटी महामंडळाकडे त्यांचे लक्ष आहे. सर्वच बाजुंनी वाढलेल्या खर्चांमुळे खासगी बस वाहतूकदार अडचणीत सापडले आहेत. महाराष्ट्र परमिट, शहर परमिट, विविध प्रकारचे कर, दंड, वाहनतळ हे खर्च दिवसेंदिवस वाढत असून, शासनाकडून कोणत्याही प्रकारच्या सुविधा पुरविल्या जात नाहीत. सुरक्षेच्या दृष्टीने वाहनामध्ये विविध उपकरणे, प्रणाली बसविण्याची सक्ती केली जात असल्याने त्याचाही अतिरिक्त भुर्दंड व्यावसायिकांना सोसावा लागत आहे. त्यामुळे ही दरवाढ नफा कमावण्यासाठी नाही, तर काहीप्रमाणात तोटा भरून काढण्यासाठी करावी लागत आहे." तुषार जगताप म्हणाले, "मिनी बस किंवा टेम्पो ट्रॅव्हलरसह अन्य बस गाड्यांच्या किंमतीमध्ये दुपटीने वाढ झाली आहे. टायर्सचे दर दीडपट झाले आहेत. ऑइलमध्ये ७० ते ८० टक्क्यांची वाढ झाली आहे, तर ॲड. ब्ल्यूचा खर्च नव्याने वाढला आहे. स्पेअर पार्टस, बॅटरी यांच्याही किमती दुपटीने वाढल्या आहेत. चालकांचा पगार, भत्ता, आरटीओचे पासिंग व फिटनेस चार्जेस, विमा आणि शासकीय ई-चालनामध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. या पार्श्वभूमीवर आम्हाला व्यवसाय व त्यावर अवलंबून असलेल्या घटकांना वाचवण्यासाठी ही दरवाढ करणे क्रमप्राप्त आहे. सरकारने समिती स्थापन करून खासगी वाहनांसाठी रिक्षाप्रमाणे दरपत्रक निश्चित करावे."

प्रस्तावित बस भाडेवाढ (किमीप्रमाणे)

बस/गाडीचा प्रकार - जुना दर नवीन दर
१७ सीटर - २३ रुपये - २७ रुपये
२० सीटर - २५ रुपये - ३० रुपये
३२ सीटर - ३३ रुपये - ३८ रुपये
३५ सीटर - ३६ रुपये - ४२ रुपये
४० सीटर - ४१ रुपये - ४५ रुपये
४५ सीटर - ४५ रुपये - ५५ रुपये
४९ सीटर - ४५ रुपये - ५५ रुपये

थोडक्यात पण महत्वाचे



भारत विकास परिषदेतर्फे दिव्यांगांना कृत्रिम पायाचे मोफत वाटप

पुणे : दैनिक संध्या

भारत विकास परिषदेच्या पुण्यातील दिव्यांग पुनर्वसन केंद्रामध्ये आज ७५ गरजू दिव्यांगांना कृत्रिम अत्याधुनिक पाय मोफत बसविण्यात आले. सुमारे ५० ते ७५ हजार रुपयांची किंमत असलेले पाय सिरम इन्स्टिट्यूटच्या विलू पुनावाला फौंडेशन यांच्या आर्थिक सहयोगातून आणि आर ए सस्टेनेबल एनर्जी सोल्यूशन यांच्या सहाय्याने या दिव्यांगांना मोफत बसवण्यात आले. आज झालेल्या या कार्यक्रमात काही दिव्यांगांनी विविध हालचाली करून प्रात्यक्षिके देखील करून दाखवली. कृत्रिम पाय बसवल्यावर दिव्यांगांनी जिना चढणे, मांडी घालून बसणे, उकिडवे बसणे, वीरासनात बसणे, धावणे वगैरे कृती करून दाखवल्या. पुनावाला ग्रुपतर्फे शेखर ढवळीकर, सुंदे कविटकर उपस्थित होते. भारत विकास परिषदेच्या ट्रस्टचे अध्यक्ष दत्ता चितळे, केंद्रप्रमुख विनय खटावकर, ट्रस्टी राजशेखर अभ्यंकर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. गीता कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. परिषदेच्या या केंद्रातर्फे येत्या २३ ऑक्टोबर रोजी आळंदी, २९ ऑक्टोबर रोजी यवतमाळ आणि नोव्हेंबरमध्ये खामगाव येथे मोफत शिबिरे होणार आहेत, अशी माहिती यावेळी विनय खटावकर यांनी दिली.

या सणासुदीच्या काळात फोनपेवर परवडणारा फायरक्रॅकर इन्शुरन्स मिळवा

पुणे : दैनिक संध्या

फोनपे ने आपल्या प्लॅटफॉर्मवर सलग तिसऱ्या वर्षी सर्वसमावेशक फायरक्रॅकर इन्शुरन्स पुन्हा उपलब्ध करून देण्याची घोषणा केली आहे. दिवाळीच्या सणादरम्यान फटाक्यांमुळे होणाऱ्या अपघातांपासून पूर्ण संरक्षण देण्यासाठी, हा विमा ₹11 पासून सुरू होणाऱ्या परवडणाऱ्या निश्चित प्रीमियमवर ₹25,000 पर्यंतचे व्यापक वैद्यकीय कव्हर प्रदान करतो. फोनेपे प्लॅटफॉर्मवर डिजिटल स्वरूपात उपलब्ध असलेला आणि आदित्य बिर्ला हेल्थ इन्शुरन्सद्वारे अंडरराइट केलेला हा सिझनल मायक्रो-इन्शुरन्स ग्राहकांना अधिक विश्वास आणि संरक्षण देण्याच्या उद्देशाने सादर करण्यात आला आहे; जेणेकरून एखाद्या अनपेक्षित घटनेच्या वेळी आपल्या पाठीशी आर्थिक पाठबळ आहे या खात्रीने ते सणांचा आनंद घेऊ शकतील.

कर्करोगग्रस्त महिलांसाठी गरबा-दांडिया नाइटचे आयोजन

■ पुणे (दै. संध्या)



स्तनाच्या कर्करोग जनजागृती महिन्यानिमित्त आणि दसऱ्याचे औचित्य साधून रुबी हॉल क्लिनिकतर्फे स्तनाच्या कर्करोगाशी लढा देणाऱ्या २० रुग्णांसाठी गरबा आणि दांडिया नाइटचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून रुग्णांना संगीत, नृत्य आणि आनंदाच्या माध्यमातून सण साजरा करण्याची संधी मिळाली. स्तनविकार शल्यचिकित्सक डॉ. अनुपमा माने, वैद्यकीय कर्करोगतज्ज्ञ डॉ. रेश्मा पूर्णिक, डॉ. रुचिता बोहिर आणि त्यांच्या टीमने कार्यक्रमाचे आयोजन केले. उपचारांसोबत भावनिक आधार आणि सकारात्मकता जपण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी रुग्णांनी एकत्रितपणे आकाशकंदील सोडून आशा, एकजूट आणि नव्या उमेदेचा संदेश दिला.यावेळी रोटरी क्लब, पुणेचे पोस्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर विवेक आरान्हा आणि रोटरी क्लब, पुणेच्या अध्यक्षा आरती ठक्कर यांचीही उपस्थिति होत्या.

सोनालिका ट्रॅक्टर्सने 'दम' तयार करून रचला जागतिक विक्रम

■ पुणे (दै. संध्या)



सोनालिका ट्रॅक्टर्सने 'दम' या हिंदी शब्दाचे जमिनीवर सर्वात मोठे कोरीवकाम करून एक नवीन जागतिक विक्रम रचला आहे आणि 'जीतने का दम'च्या अदम्य उत्साहाचा उत्सव साजरा केला आहे. भारताचा नं. १ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड असलेल्या सोनालिकाने उत्तर प्रदेशातील बुलंदशहर जिल्ह्यातील सिकंदराबाद येथील एका शेतजमिनीवर १२५ फूट उंच, २७२ फूट रुंद आणि ३४,००० चौरस फूट क्षेत्रफळावरील सर्वात मोठी प्रतिकृती तयार केली. त्यासाठी सोनालिकाने आपल्या सुप्रसिद्ध आणि भविष्यासाठी सज्ज असलेल्या गोल्ड सिरीज ट्रॅक्टर्सचा वापर केला. शेतकऱ्यांच्या दृष्टीने 'दम' म्हणजे प्रत्येक हंगामाची आशेने सुरुवात करण्याचे सामर्थ्य. दृढनिश्चयाच्या याच दैनंदिन प्रतीकातून सोनालिकाने प्रेरणा घेऊन ज्या मातीत ते जिवंत होते, त्याच मातीत एक असाधारण रूप दिले आहे. सोनालिका गोल्ड सिरीज ट्रॅक्टर्स ही सोनालिकाची नवीनतम आणि नाविन्यपूर्ण ट्रॅक्टर सिरीज असून ती त्यांच्या जगातील क्रमांक १ एकात्मिक ट्रॅक्टर उत्पादन प्रकल्पात विकसित करण्यात आली आहे. हा प्रकल्प उच्च दर्जाच्या ट्रॅक्टर्ससाठी रोबोट्स आणि ऑटोमेशनद्वारे चालतो. हा विक्रम साधण्यासाठी, सोनालिका गोल्ड डीआय ७४५ III आणि सोनालिका गोल्ड डीआय ५५ III या दोन दमदार ट्रॅक्टर्सचा वापर करण्यात आला. या दोन्ही ट्रॅक्टर्ससोबत १० फुटांचे रोटाव्हेटर्स जोडून शेतीतील प्रचंड शक्ती आणि क्षमता दाखवून देण्यात आली. सोनालिका गोल्ड सिरीजमध्ये तिच्या वर्गातील सर्वात मोठे ३-सिलेंडर ३५३२ सीसी ई३.५ इंजिन, मल्टी-स्पीड ड्राईव्हलाईन (१६एफ+४आर/१२एफ+३आर) आणि जेट लाईन हँड थ्रॉटल तंत्रज्ञान यांसारखी वैशिष्ट्ये आहेत. ही वैशिष्ट्ये शेतकऱ्यांना 'जीतने का दम' देऊन सक्षम करण्याच्या सोनालिकाच्या दृढ कटिबद्धतेचे प्रतीक आहेत, त्यामुळे ते शेतीतील स्वतःचेच मागील विक्रमही मोडीत काढू शकतील.

स्पोर्ट्सस्किल तर्फे पुण्यात पहिल्या फिजिकल हाय-परफॉर्मन्स सेंटरचा शुभारंभ

■ सातवेळा वर्ल्ड मास्टर्स चॅम्पियन ठरलेल्या जिऑफ डॅव्हनपोर्ट आणि सहावेळा नॅशनल स्कॉश चॅम्पियन ठरलेल्या रिषाद पांडोले यांच्या हस्ते उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)



चान्स-२-स्पोर्ट्स फाउंडेशनच्या पाठीशी असलेल्या 'स्पोर्ट्सस्किल' या स्पोर्ट्स-टेक आणि ॲथलीट डेव्हलपमेंट प्लॅटफॉर्मने आज आपले तंत्रज्ञान स्क्रीनवरून थेट कोर्टवर आणले. कंपनीने पुण्यात थुबे पार्क येथील इन्फिनिटी बिझनेस पार्कच्या १६ व्या मजल्यावर 'स्पोर्ट्सस्किल एक्स' हे आपले पहिले भौतिक हाय-परफॉर्मन्स सेंटर सुरू केले. इमारतीच्या १६ व्या मजल्यावर वसलेले आणि शहराच्या नयनरम्य दृश्याची अनुभूती देणारे 'स्पोर्ट्सस्किल एक्स' हे भारत आणि आशियातील सर्वांत उंचावर असलेल्या स्कॉश सुविधांपैकी एक आहे. या सेंटरचे उद्घाटन ऑस्ट्रेलियाचे सात वेळा वर्ल्ड मास्टर्स स्कॉश चॅम्पियन आणि वर्ल्ड मास्टर्सच्या इतिहासातील सर्वांत यशस्वी खेळाडूंपैकी एक असलेल्या जिऑफ डॅव्हनपोर्ट यांच्या हस्ते झाले. या सोहळ्याला सहा वेळा राष्ट्रीय स्कॉश चॅम्पियन आणि नामांकित व्यावसायिक रिषाद पांडोले हेदेखील उपस्थित होते. त्यांच्यासोबत सह-संस्थापक अभिनव सिन्हा आणि चेतन देसाई यांच्यासह अन्य ॲथलीट्स, प्रशिक्षक, पालक आणि पुण्यातील क्रीडा व व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. ॲप खेळाडूला काय सुधारायचे आहे हे सांगू शकते; पण हाय-परफॉर्मन्स सेंटर ही ती जागा आहे जिथे ते प्रत्यक्ष सुधारणा घडवून आणतात. दोन्ही एकाच ब्रँडखाली आल्यामुळे, स्पोर्ट्सस्किलने मूल्यांकन आणि प्रशिक्षण यातील अंतर भरून काढले आहे. अशा प्रकारे ॲपवरील पहिल्या मूल्यांकनापासून ते कोर्टवरील उच्च दर्जाच्या प्रशिक्षणापर्यंत स्वतःचे 'फिजीटल' मॉडेल चालवणारा हा भारतातील मोजक्या स्पोर्ट्स-टेक प्लॅटफॉर्म्सपैकी एक ठरला आहे. याची वेळही अत्यंत महत्त्वाची आहे. 'लॉस एंजेलीस २०२८' च्या ऑलिम्पिकमध्ये स्कॉश या खेळाचा पदार्पण म्हणून समावेश होत असल्याने, भारतीय खेळाडूंना केवळ परदेशातच नाही तर मायदेशातही जागतिक दर्जाच्या प्रशिक्षणाची गरज आहे. स्पोर्ट्सस्किल एक्सची उभारणी याच उद्देशाने करण्यात आली आहे, जी त्यांच्या "अबोव्ह द सिटी, बियाँड द गेम" (शहर ओळखणाऱ्या उंचीवर, खेळाच्याही पलीकडे) या ब्रीदवाक्याला सार्थ ठरवते.

भारतातील बहुतांश स्पोर्ट्स-टेक प्लॅटफॉर्म्स केवळ फोनपुरतेच मर्यादित राहतात. म्हणजे ट्रॅकिंग, रँकिंग किंवा बुकिंग करणारे ॲप्स. परंतु, स्पोर्ट्सस्किलने अधिक समावेशक मार्ग निवडला आहे. गेल्या काही वर्षांत यांच्या ॲपने १० ते १२ शहरांमधील खेळाडूंचे ट्रेनिंग, मॅच फुटेज आणि प्रगतीची नोंद ठेवली आहे. स्पोर्ट्सस्किल एक्स मुळे या डेटाला एक प्रत्यक्ष भौतिक केंद्र मिळाले आहे, जिथे प्रशिक्षक, फिजियो आणि स्वत: खेळाडू दररोज त्यावर काम करू शकतील.

स्पोर्ट्सस्किल एक्स ची रचना केवळ भाड्याने मिळणारे कोर्ट म्हणून नाही, तर एक परिपूर्ण परफॉर्मन्स इकोसिस्टम म्हणून करण्यात आली आहे. हे केंद्र तंत्रज्ञान, मार्गदर्शन, कामगिरी आणि संधी या चार स्तंभांवर आधारित आहे. येथील नवीन जागतिक दर्जाच्या स्कॉश कोर्ट्स आणि इतर क्रीडा सुविधांव्यतिरिक्त, या केंद्रात स्ट्रेंथ अँड कंडिशनिंग झोन, व्हिडिओ अँड डेटा ॲनालिसिस सुट आणि एक समर्पित रिकव्हरी एरिया देखील आहे. स्पोर्ट्सस्किल एक्स मधील प्रत्येक कोर्ट सेशनची माहिती स्पोर्ट्सस्किल ॲपमध्ये अपडेट केली जाईल, ज्याचा वापर सध्या ३०० हून अधिक सक्रिय वापरकर्ते प्रशिक्षण नोंदवण्यासाठी, मॅच फुटेज अपलोड करण्यासाठी आणि वैयक्तिक फीडबॅक मिळवण्यासाठी करत आहेत. या केंद्रात कॅप्चर केलेला व्हिडिओ आणि परफॉर्मन्स डेटा प्रत्येक खेळाडूची योजना आखण्यास मदत करेल, ज्यामुळे खेळाडूची प्रगती ही केवळ अंदाजावर न राहता मोजता येण्याजोगी असेल.

पर्यावरण संवर्धनासाठी कार्यरत 'वृक्षदाई प्रतिष्ठान'ला जनसेवा पुरस्कार २०२६

जनसेवा सहकारी बँकेचा ५४ वा वर्धापनदिन; एक लाख एक हजार रुपयांचा पुरस्कार

■ पुणे (दै. संध्या)



पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या श्रीक्षेत्र देहू येथील 'वृक्षदाई प्रतिष्ठान' या संस्थेला यंदाचा 'जनसेवा पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात येणार आहे. जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे यांच्या ५४ व्या वर्धापनदिनानिमित्त या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. हा सोहळा शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता माळवाडी, हडपसर येथील विठ्ठल तुपे पाटील नाट्यगृहात आयोजित करण्यात आला आहे. या पुरस्काराचे स्वरूप एक लाख एक हजार रुपयांचा धनादेश, सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एअर मार्शल (निवृत्त) भूषण गोखले असणार असून, केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री तथा खासदार मुरलीधर मोहोळ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. प्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञ डॉ. नंदकुमार मुलमुले हे प्रमुख वक्ते म्हणून 'सुखाचा शोध' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी पुणे शहरातील लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. ही माहिती जनसेवा सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र हिरेमठ, संचालक राजेंद्र वालेकर, सचिन शिरुडे, राजन वडके आणि मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष पोळेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जनसेवा सहकारी बँकेने आपल्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून २४ ऑक्टोबर १९९८ पासून सामाजिक, आरोग्य, शैक्षणिक आणि सेवाभावी क्षेत्रांत निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या संस्थांना 'जनसेवा पुरस्कार' देण्याची परंपरा सुरू केली आहे. समाजाच्या उन्नतीसाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या संस्थांच्या कार्याची दखल घेणे आणि त्यांच्या सेवाभावी कार्याला प्रोत्साहन देणे, हा या पुरस्कारामागील प्रमुख उद्देश आहे.

या पुरस्काराच्या माध्यमातून विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या संस्थांचा गौरव करण्यात आला आहे. सन २०२० मध्ये पुरंदर तालुक्यातील वीर येथील 'अस्तित्व प्रतिष्ठान'ला, तर २०२१ मध्ये वेल्हे येथील 'तोरणा राजगड परिसर समाजोन्नती न्यास'ला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन २०२२ मध्ये पुण्यातील 'पूर्णम इको व्हिजन फाऊंडेशन' आणि सिन्नर येथील 'वनप्रस्थ फाऊंडेशन' या संस्थांना प्रत्येकी ५१ हजार रुपयांचा पुरस्कार देण्यात आला. सन २०२४ मध्ये वंचित समाजाच्या आरोग्य आणि सक्षमीकरणासाठी कार्य करणाऱ्या पुण्यातील 'निरामय, सिंहगड रोड' या संस्थेचा गौरव करण्यात आला. सन २०२५ मध्ये कर्णबधिर मुलांना ऐकण्याच्या आणि बोलण्याच्या क्षमतेच्या विकासासाठी कार्य करणाऱ्या 'कॉक्लिआ पुणे फॉर हिअरिंग अँड स्पीच' या संस्थेला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यंदा पर्यावरण संवर्धनासाठी समर्पित असलेल्या 'वृक्षदाई प्रतिष्ठान'ची निवड करण्यात आली असून, या माध्यमातून पर्यावरणविषयक कार्याला प्रोत्साहन मिळणार आहे. सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या संचालकांनी समाजातील विविध घटकांना आर्थिक साहाय्य उपलब्ध करून दिले. त्यामुळे बँकेने अल्पावधीतच ग्राहकांचा विश्वास संपादन केला. 'बहुत जनांसी आधारू' ही बँकेची ओळख निर्माण झाली. सध्या बँकेच्या एकूण २८ शाखा कार्यरत आहेत. त्यापैकी पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात २१, पुणे जिल्ह्यात तीन, सातारा जिल्ह्यात तीन आणि ठाणे येथे एक शाखा आहे. बँकेची स्वतःची २२ एटीएम केंद्रे असून, रुपे कार्डच्या माध्यमातून ग्राहकांना इतर बँकांच्या एटीएम केंद्रांचाही वापर करता येतो. ग्राहकांच्या सोयीसाठी बँकेने मोबाईल बँकिंग, यूपीआयद्वारे व्यवहार, इंटरनेट बँकिंगची दृश्य-मात्र सुविधा आणि रुपे प्लॅटिनम कॉन्टॅक्टलेस कार्ड यांसारख्या सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. तसेच विमा व्यवसायासह विविध पूरक बँकिंग सेवाही ग्राहकांना पुरविल्या जातात. आर्थिक सेवा पुरविण्याबरोबरच जनसेवा सहकारी बँक सामाजिक उत्तरदायित्वही जपत आहे. कोणताही गाजावाजा न करता शैक्षणिक, आरोग्यविषयक, सामाजिक आणि नैसर्गिक आपत्तीच्या काळात गरजू संस्था व घटकांना मदत करण्याची बँकेची परंपरा आहे. सासवडजवळील एखतपूर गावाच्या सर्वांगीण विकासासाठी बँकेने आर्थिक मदतीचा हात दिला आहे. पुरंदर तालुक्यातील खळद गावाच्या पाणीपुरवठा योजनेच्या जलवाहिनीसाठीही भरीव आर्थिक साहाय्य केले. त्यामुळे गावाच्या पाणीप्रश्नावर तोडगा काढण्यास मदत झाली. दरवर्षी १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात उपस्थितांसाठी पेयपानाची व्यवस्था केली जाते. तसेच मकरसंक्रांतीच्या निमित्ताने सभासद, ग्राहक आणि बँकेच्या सेवकांच्या महिलांसाठी हळदी-कुंकू समारंभाचे आयोजन केले जाते. आर्थिक प्रगतीसोबत सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या जनसेवा सहकारी बँकेच्या ५४ व्या वर्धापनदिनानिमित्त यंदा पर्यावरण संवर्धनासाठी कार्यरत असलेल्या 'वृक्षदाई प्रतिष्ठान'चा गौरव होणार असून, या पुरस्कार सोहळ्याकडे सामाजिक आणि पर्यावरण क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

संघर्षातून उभी राहिलेली जनसेवा सहकारी बँक

हडपसर हा परिसर पूर्वी ग्रामीण स्वरूपाचा असताना, सामाजिक बांधिलकीची जाणीव असलेल्या काही समविचारी कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन भिशी मंडळाची स्थापना केली. कै. मामासाहेब हजारे, कै. आबनावे गुरुजी, कै. रघुनाथ कचरे, कै. मधुकरराव टेमगिरे आणि कै. रामचंद्र मारुती रासकर यांच्या पुढाकारातून या उपक्रमाला सुरुवात झाली. भिशी मंडळाचे व्यवहार वाढू लागल्यानंतर स्वतंत्र सहकारी बँकेची गरज जाणवू लागली. त्यातूनच १९७२ मध्ये जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे या बँकेची स्थापना झाली. सामाजिक कार्यकर्त्यांना बळ देणे आणि ग्रामीण भागातील नागरिकांना आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देणे, हा बँकेच्या स्थापनेमागील प्रमुख हेतू होता.

५४ वर्षांच्या प्रवासात भरीव प्रगती

सभासद, ग्राहक आणि हितचिंतक यांनी स्थापनेपासून दाखविलेला विश्वास आणि दिलेला पाठिंबा यामुळे बँकेने ५४ वर्षांचा यशस्वी प्रवास पूर्ण केला आहे. स्थिरता, सक्षमता, परिपक्वता आणि व्यापक दृष्टिकोन यांच्या बळावर बँकेने आपला व्यवसाय विस्तारला आहे. ३१ मार्च २०२६ अखेर बँकेच्या ठेवी २,०८१.३८ कोटी रुपये, तर कर्जवाटप १,१५८.८७ कोटी रुपये इतके होते. बँकेचा एकूण व्यवसाय ३,२४०.२५ कोटी रुपयांवर पोहोचला आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



बुद्धभूमी फाउंडेशनच्या जमिनीचा प्रश्न सामोपचाराने सोडवावा : अण्णा बनसोडे

■ जमीन कायमस्वरूपी भाडेतत्त्वावर देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश

मुंबई : दैनिक संध्या

कल्याण तालुक्यातील मौजे चिकणघर येथील बुद्धभूमी फाउंडेशनच्या दीर्घकालीन ताब्यातील जमिनीचे संरक्षण, अनधिकृत टी.डी.आर. व नोंदी रद्द करणे तसेच बुद्धभूमी आंतरराष्ट्रीय बौद्ध पर्यटन केंद्र विकसित करण्याबाबत विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनात आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत जमिनीचा प्रश्न सामोपचाराने सोडविण्याचे निर्देश अण्णा बनसोडे यांनी दिले. संबंधित जमीन कायमस्वरूपी भाडेतत्त्वावर देण्याबाबत तसेच त्यासंदर्भातील नोंद सातबारा उताऱ्यावर घेण्यासाठी आवश्यक प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. याशिवाय, एमएमआरडीएमार्फत करण्यात आलेल्या कामांमुळे बुद्धभूमी फाउंडेशनचे काही नुकसान झाले असल्यास ते संबंधित कंत्राटदाराकडून करून घेण्याचे निर्देशही बनसोडे यांनी यावेळी दिले. बैठकीस कल्याण-डोंबिवली महानगरपालिका,एमएमआरडीएचे अधिकारी तसेच बुद्धभूमी फाउंडेशनचे प्रतिनिधी उपस्थित होते.

ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी डीपीजीयूचा पहिला दीक्षांत समारंभ २९ ऑक्टोबरला

पुणे : दैनिक संध्या

ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी (डीपीजीयू)चा पहिला दीक्षांत समारंभ तसेच विद्यापीठातील नव्याने उभारण्यात आलेल्या शैक्षणिक सुविधांचे उद्घाटन गुरुवार, २९ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता ताथवडे येथील डीपीजीयू स्कूल ऑफ मॅनेजमेंट अँड रिसर्च, सर्व्हे क्रमांक १३८, जीवननगर कॅम्पस येथे होणार आहे. महाराष्ट्र शासनाचे उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्यमंत्री मा. ना. श्री. चंद्रकांत (दादा) पाटील हे या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते विद्यापीठाच्या नव्या शैक्षणिक सुविधांचे औपचारिक उद्घाटन करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या सल्लागार परिषदेचे सदस्य तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे (एसपीपीयू) सदस्य मा. श्री. राजेश पांडे हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहतील. लोकमत मीडिया प्रा. लि., पुणेचे ग्रुप एडिटर श्री. विजय बाविस्कर यांना त्यांच्या उल्लेखनीय योगदान आणि कार्याची दखल घेत विद्यापीठातर्फे मानद 'डॉक्टर ऑफ लिटरेचर' (डी.लिट.) ही पदवी प्रदान करण्यात येणार आहे. दीक्षांत समारंभाची सुरुवात मान्यवरांच्या आगमनाने आणि छायाचित्रणानंतर होणाऱ्या औपचारिक मिरवणुकीने होईल. त्यानंतर वंदे मातरम्, दीपप्रज्वलन आणि दीक्षांत समारंभाच्या उद्घोषणेचा कार्यक्रम होईल. कुलगुरू स्वागतपर भाषण करून विद्यापीठाचा वार्षिक अहवाल सादर करतील. यावेळी मान्यवरांचा सत्कार तसेच पदवीधारक विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येईल. गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्णपदकांचे वितरण करण्यात येणार आहे.

प्रोजेक्ट स्कूल संसद २०२६-२७ साठी नोंदणी सुरू

पुणे : दैनिक संध्या

दीपस्तंभ चॅरिटेबल ट्रस्टच्या 'स्कूल संसद' या अनोख्या शैक्षणिक उपक्रमाच्या २०२६-२७ च्या आवृत्तीची घोषणा करण्यात आली असून डिसेंबर २०२६ मध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये प्रादेशिक प्राथमिक फेऱ्यांनी सुरू होईल.या स्पर्धेतून सर्वोत्तम १५० विद्यार्थी प्रतिनिधींची निवड केली जाईल. गेल्या १३ वर्षांपासून, हा प्रकल्प इयत्ता ८ वी आणि ९ वीच्या विद्यार्थ्यांना लोकशाही आणि संसदीय प्रणालीचा थेट व व्यावहारिक अनुभव देत आहे. आजच्या काळात, एकीकडे राजकारण आणि प्रशासनाविषयी सर्वसामान्यांच्या मनात नकारात्मकता पसरली आहे, तर दुसरीकडे शाळांमधील नागरिकशास्त्र केवळ पाठ्यपुस्तकातील सिद्धांतापुरतेच मर्यादित राहिले आहे. ही मोठी दरी सांधण्यासाठी, 'स्कूल संसद' विद्यार्थ्यांना एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देते, जिथे विद्यार्थी स्वतः कायदेकर्ते (खासदार/आमदार) बनून सामाजिक प्रश्नांवर चर्चा करतात आणि धोरणनिर्मितीची प्रक्रिया समजून घेतात. ही एक वक्तृत्व स्पर्धा नसून, आपल्या संविधानातील 'न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता' या मूल्यांचे जतन करण्यासाठी समर्पित असलेली एक चळवळ आहे.

चेन्नईत ९ ते ११ डिसेंबरदरम्यान दहावे युनिफॉर्म मॅन्युफॅक्चरर्स फेअर २०२६

१५० हून अधिक ब्रँड्स, २५ हजारांहून अधिक गणवेशांच्या डिझाईन्ससह टॉवेल, चादरी आणि नॅपकिन्सची भव्य मांदियाळी

■ चेन्नई (दै. संध्या)

सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या (एसजीएमए) वतीने दहाव्या 'युनिफॉर्म मॅन्युफॅक्चरर्स फेअर २०२६'चे आयोजन ९ ते ११ डिसेंबरदरम्यान चेन्नईतील नंदंबक्कम येथील चेन्नई ट्रेड सेंटरमध्ये करण्यात आले आहे. देशभरातील गणवेश आणि टॉवेल उत्पादकांना एकाच व्यासपीठावर आणणारे हे तीन दिवसीय व्यावसायिक प्रदर्शन उद्योग क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

या प्रदर्शनात देशभरातील १५० हून अधिक नामांकित ब्रँड्स सहभागी होणार असून, २५ हजारांहून अधिक गणवेश, कापड आणि संबंधित साहित्याच्या विविध डिझाईन्सचे प्रदर्शन करण्यात येणार आहे. याशिवाय टॉवेल, चादरी आणि नॅपकिन्सच्या विविध प्रकारांनाही विशेष स्थान देण्यात येणार आहे. शिक्षण, आरोग्य, आदरातिथ्य, औद्योगिक आणि कॉर्पोरेट क्षेत्रांमध्ये गणवेशांची मागणी सातत्याने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर उत्पादक, वितरक, घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते, शैक्षणिक संस्था, रुग्णालये आणि कॉर्पोरेट खरेदीदार यांना थेट व्यावसायिक संपर्क प्रस्थापित करण्याची संधी या प्रदर्शनातून उपलब्ध होणार आहे. प्रदर्शनात शालेय, महाविद्यालयीन, क्रीडा, औद्योगिक, कॉर्पोरेट आणि रुग्णालयीन गणवेशांसह हिवाळी कपडे, ब्लेझर्स, गणवेशासाठीचे कापड, पट्टे, टाय, बोधचिन्ह छपाई साहित्य, बूट, मोजे आणि शालेय दप्तरांची विविधता पाहायला मिळणार आहे. यंदाच्या प्रदर्शनात 'व्हायब्रंट टॉवेल' या उपक्रमांतर्गत टॉवेल उत्पादकांचाही विशेष सहभाग असेल. आंघोळीचे टॉवेल, भेटवस्तू संच, जलतरण तलावांसाठीचे टॉवेल, स्वयंपाकघरातील टॉवेल, समुद्रकिनाऱ्यावरील वापरासाठीचे टॉवेल, स्नानवस्त्रे, चादरी आणि प्रसिद्ध सोलापुरी चादरी यांची विस्तृत श्रेणी येथे उपलब्ध होणार आहे.



Shri Ashok Chavan
Fair Chairman, SGMA



Shri Aniket Mahindrakar
Fair Secretary, SGMA

एसजीएमएचे प्रदर्शन समितीचे अध्यक्ष अशोक चव्हाण म्हणाले, "२०१७ मध्ये पहिल्या प्रदर्शनापासून आम्ही गणवेश उत्पादन क्षेत्र अधिक सक्षम आणि आधुनिक करण्यासाठी प्रयत्नशील आहोत. दहाव्या प्रदर्शनाच्या माध्यमातून तयार कपडे, कापड, विविध साहित्य आणि पादत्राणे यांसह संपूर्ण उत्पादन साखळी एकाच व्यासपीठावर आणली जात आहे. भारतीय उत्पादकांना देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अधिक स्पर्धात्मक बनवणे हा आमचा मुख्य उद्देश आहे."

एसजीएमएचे प्रदर्शन समितीचे सचिव अनिकेत महिंद्रकर यांनी सांगितले की, गणवेश उद्योगात रचना, कापड, तंत्रज्ञान आणि विपणन क्षेत्रांत वेगाने बदल होत आहेत. या प्रदर्शनामुळे उद्योजकांना नवीन व्यावसायिक प्रवाह समजून घेण्यासह प्रस्थापित आणि नवोदित उत्पादकांशी संपर्क साधता येणार आहे. वितरक, विक्रेते, शाळा, रुग्णालये, कंपन्या आणि नवउद्योजकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

सोलापूरचे गणवेश आणि टॉवेल उत्पादन क्षेत्र देशाच्या वस्त्रोद्योगात महत्त्वाचे योगदान देत आहे. मोठ्या प्रमाणावर उत्पादन, वेळेत मालाचा पुरवठा आणि कमी प्रमाणातील तसेच पुनरावृत्तीच्या मागण्या पूर्ण करण्याची क्षमता यांमुळे सोलापूरच्या उत्पादकांनी देशभरात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. २०१७ मध्ये सोलापूरमधून सुरू झालेल्या या प्रदर्शनाचा विस्तार बंगळुरू, मुंबई, हैदराबाद आणि वाराणसी यांसारख्या प्रमुख शहरांपर्यंत झाला आहे. या उपक्रमाने आतापर्यंत ३०० हून अधिक उद्योजकांना व्यवसायवाढीसाठी महत्त्वपूर्ण व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. 'मेक इन इंडिया' उपक्रमाला चालना देणे, देशांतर्गत पुरवठा साखळी मजबूत करणे आणि भारतीय उत्पादकांसाठी जागतिक बाजारपेठेत नव्या संधी निर्माण करणे, ही या प्रदर्शनामागील प्रमुख उद्दिष्टे आहेत.

प्रदर्शनाची माहिती

- प्रदर्शनाचे नाव : दहावे युनिफॉर्म मॅन्युफॅक्चरर्स फेअर २०२६
- दिनांक : ९ ते ११ डिसेंबर २०२६
- स्थळ : चेन्नई ट्रेड सेंटर, सभागृह क्रमांक ४, नंदंबक्कम, चेन्नई, तामिळनाडू – ६०००८९
- आयोजक : सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (एसजीएमए)
- संकेतस्थळ : www.sgma.in
- संपर्क क्रमांक : +९१-८००१९००११२

'हर घर धुरंधर'! रणवीर सिंहचा 'धुरंधर' चित्रपट २५ ऑक्टोबरला प्रथमच फ्रीडिशवर

■ अकोला (दै. संध्या)

अभिनेता रणवीर सिंह याच्या प्रमुख भूमिकेतील 'धुरंधर' हा गाजलेला स्पाय थ्रिलर चित्रपट आता देशभरातील प्रेक्षकांना घरबसल्या पाहता येणार आहे. 'हर घर धुरंधर' या विशेष उपक्रमांतर्गत हा चित्रपट रविवार, २५ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता प्रथमच फ्रीडिश प्रेक्षकांसाठी प्रदर्शित होणार आहे. स्टार उत्सव मूव्हीज, कलर्स सिनेप्लेक्स बॉलिवूड आणि कलर्स सिनेप्लेक्स सुपरहिट्स या तीन वाहिन्यांवर एकाच वेळी चित्रपटाचा प्रीमियर होणार आहे.

दहा कोटींहून अधिक घरांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा असलेल्या या उपक्रमामुळे महानगरांपासून ते छोट्या शहरांपर्यंत आणि ग्रामीण भागांतील प्रेक्षकांनाही या चित्रपटाचा आनंद घेता येणार आहे. देशासाठी पडद्यामागे राहून गुप्तपणे कार्य करणाऱ्या अज्ञात वीरांना समर्पित असलेल्या या चित्रपटात ॲक्शन, थरार आणि उत्कंठावर्धक प्रसंगांची मेजवानी आहे. रणवीर सिंह एका दमदार भूमिकेत दिसत असून, त्याच्यासोबत अक्षय खन्ना, संजय दत्त, आर. माधवन, अर्जुन रामपाल, राकेश बेदी आणि सारा अर्जुन यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. आदित्य धर यांनी दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटाला त्यातील भव्य ॲक्शन दृश्ये, प्रभावी संवाद आणि कलाकारांच्या अभिनयासाठी प्रेक्षकांची पसंती मिळाली आहे. शाश्वत सचदेव यांच्या संगीतानेही चित्रपटाच्या लोकप्रियतेत भर घातली आहे. 'धुरंधर'चा फ्रीडिशवरील प्रीमियर हा चित्रपट अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा उपक्रम मानला जात आहे. या माध्यमातून मनोरंजनाचा अनुभव देशाच्या कानाकोपऱ्यातील कुटुंबांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.



■ सायंकाळी ७ वाजता स्टार उत्सव मूव्हीज, कलर्स सिनेप्लेक्स बॉलिवूड आणि कलर्स सिनेप्लेक्स सुपरहिट्सवर एकाच वेळी प्रीमियर

या उपक्रमाबाबत जिओस्टारच्या प्रवक्त्याने सांगितले, "'धुरंधर' हा केवळ चित्रपट राहिलेला नसून तो लोकप्रिय संस्कृतीचा महत्त्वाचा भाग बनला आहे. 'हर घर धुरंधर'च्या माध्यमातून हा चित्रपट भारतातील प्रत्येक भागातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचवताना आम्हाला आनंद होत आहे. २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजल्यापासून विविध वाहिन्यांवर चित्रपटाचा आनंद घेण्याची संधी प्रेक्षकांना मिळणार आहे."

पॅकेज्ड आणि फ्रोझन फूड्स खरेदी करताना ग्राहकांनी कोणत्या गोष्टी लक्षात घ्याव्यात?

■ घटक, प्रथिनांचे प्रमाण, साठवणूक आणि अन्नसुरक्षेची माहिती वाचणे महत्त्वाचे

■ पुणे (दै. संध्या)

आरोग्यदायी आहाराबाबत वाढती जागरूकता आणि धावपळीची जीवनशैली यांमुळे पॅकेज्ड आणि फ्रोझन फूड्सचा वापर वाढत आहे. मात्र, अशी उत्पादने खरेदी करताना केवळ पॅकेटच्या दर्शनी भागावरील आकर्षक माहितीवर अवलंबून न राहता त्यावरील घटक, पोषणमूल्ये, साठवणुकीच्या सूचना आणि प्रक्रिया पद्धती समजून घेणे आवश्यक आहे.

आज ग्राहक दैनंदिन आहारात प्रथिनयुक्त आणि आरोग्याच्या दृष्टीने योग्य पर्यायांचा समावेश करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे उत्पादनाच्या पॅकेटवरील माहितीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. घटकांची यादी, प्रथिनांचे प्रमाण, प्रत्येक सेवनामागील प्रमाण आणि साठवणुकीच्या सूचना तपासल्यास ग्राहकांना आपल्या गरजेनुसार अधिक माहितीपूर्ण निर्णय घेता येतो. पॅकेज्ड आणि फ्रोझन फूड्सच्या बाबतीत ही माहिती विशेष महत्त्वाची ठरते. उत्पादनातील पोषणमूल्ये आणि ते तयार करण्यासाठी वापरलेल्या प्रक्रियेची माहिती समजून घेतल्यास त्याचा दैनंदिन आहारात योग्य प्रकारे समावेश करता येऊ शकतो.

गोदरेज यमीजच्या एसटीएम २.० अहवालानुसार, भारतातील ८५ टक्के व्यक्तींना आयक्यूएफ या संज्ञेचा अर्थ माहीत नाही. आयक्यूएफ म्हणजे 'इंडिव्हिज्युअली क्विक फ्रोझन' अर्थात प्रत्येक घटक स्वतंत्रपणे अतिशय कमी वेळेत गोठवण्याची प्रक्रिया.



■ या लेखाचे श्रेय डॉ. मनिका सिंग, न्यूट्रिशनल कन्सल्टंट, गोदरेज इंडस्ट्रीज ग्रुप आणि हेल्थ कम्युनिकेशन्स ॲंडव्हायझरी - गोदरेज फूड्स लिमिटेड व गोदरेज जर्सी यांना

या तंत्रज्ञानामुळे अन्नपदार्थांचे तुकडे एकमेकांना चिकटण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. तसेच उत्पादनाचा आकार, पोत आणि गुणवत्ता टिकवून ठेवण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे फ्रोझन फूड्स खरेदी करताना या प्रक्रियेची माहिती समजून घेणे उपयुक्त ठरते. पॅकेटवरील माहितीबरोबरच अन्नपदार्थांच्या निर्मिती प्रक्रियेतील स्वच्छता, कच्च्या मालाची गुणवत्ता, योग्य हाताळणी आणि साठवणूक यांनाही तितकेच महत्त्व आहे. विशेषतः गोठवलेल्या पदार्थांसाठी योग्य तापमान राखणे आवश्यक असते. उत्पादनाच्या पॅकेटवरील साठवणुकीच्या सूचना आणि वापरण्यापूर्वीच्या सूचना पाळल्यास त्याची गुणवत्ता आणि सुरक्षितता टिकवून ठेवण्यास मदत होते. उत्पादनाविषयी पारदर्शक माहिती उपलब्ध असल्यास ग्राहकांचा विश्वास वाढण्यासही मदत होते. त्यामुळे खरेदी करताना उत्पादनाची मुदत, घटकांची यादी, पोषणमूल्ये आणि साठवणुकीच्या सूचना काळजीपूर्वक वाचणे आवश्यक आहे. गोदरेज यमीजच्या मते, उत्पादनांची गुणवत्ता आणि अन्नसुरक्षा यांवर भर देताना आयक्यूएफ तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. कंपनीच्या म्हणण्यानुसार, या तंत्रज्ञानामुळे उत्पादनांची गुणवत्ता टिकवून ठेवण्यास मदत होते. कंपनी सोयीस्कर आणि प्रथिनयुक्त पर्याय उपलब्ध करून देण्यावरही भर देत आहे. एकूणच, पॅकेज्ड आणि फ्रोझन फूड्स खरेदी करताना ग्राहकांनी जाहिरातींपेक्षा उत्पादनावरील प्रत्यक्ष माहितीला अधिक महत्त्व द्यावे. पोषणमूल्ये, घटक, प्रक्रिया, साठवणूक आणि अन्नसुरक्षा यांविषयी जागरूक राहिल्यास दैनंदिन आहारासाठी अधिक योग्य निवड करता येईल.

सोयीस्कर पर्याय

आज अनेक कुटुंबांमध्ये कामाचा व्याप, प्रवास आणि व्यस्त दिनक्रमामुळे स्वयंपाकासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. अशा परिस्थितीत फ्रोझन फूड्स सोयीस्कर पर्याय ठरू शकतात. कमी पूर्वतयारीत तयार करता येणारे पदार्थ आणि स्नॅक्स यांमुळे वेळेची बचत होऊ शकते. मात्र, सोयीस्करपणासोबत पोषणमूल्यांकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. उत्पादनातील प्रथिने, मीठ, साखर, चरबी आणि एकूण ऊर्जा यांचे प्रमाण तपासून आपल्या आहाराच्या गरजांनुसार निवड करणे अधिक योग्य ठरते.

ऑस्टिओपोरोसिस : हाडांचा 'मूक' आजार, ज्याचे निदान फ्रॅक्चर झाल्यानंतरच होऊ शकते

■ पुणे (दै. संध्या)



कधीकधी किरकोळ पडणे किंवा चालताना पाय चुकीच्या पद्धतीने पडणे यामुळेही हाडाला फ्रॅक्चर होऊ शकते. अशा फ्रॅक्चरला बरे होण्यासाठी अनेक महिने लागू शकतात आणि त्यामुळे दैनंदिन कामे करण्याच्या व्यक्तीच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो. काही प्रकरणांमध्ये यामागील कारण ऑस्टिओपोरोसिस असते—हा असा आजार आहे ज्यामध्ये हाडे हळूहळू कमकुवत होत जातात आणि फ्रॅक्चर होईपर्यंत अनेकदा कोणतीही स्पष्ट लक्षणे दिसत नाहीत.

ऑस्टिओपोरोसिस हा वृद्ध व्यक्तींमध्ये आणि रजोनिवृत्तीनंतरच्या महिलांमध्ये अधिक सामान्य आहे; मात्र वय हा एकमेव जोखीम घटक नाही. कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी ची कमी पातळी, शारीरिक हालचालींचा अभाव, धूम्रपान, काही औषधे आणि कुटुंबातील फ्रॅक्चरचा इतिहास यांमुळेही धोका वाढू शकतो.

डॉ. निशित जयंत शाह, कन्सल्टंट ऑर्थोपेडिक्स, स्पोर्ट्स इंज्युरी आणि रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट तज्ज्ञ सांगतात, "लोक अनेकदा असे समजतात की फ्रॅक्चर केवळ पडल्यामुळे झाले आहे. मात्र, किरकोळ दुखापतीनंतर हाड मोडल्यास हाड आधीपासूनच कमकुवत झालेले असू शकते. ऑस्टिओपोरोसिस अनेक वर्षे निदान न होता राहू शकतो आणि त्याचे पहिले चेतावणीचिन्ह असे फ्रॅक्चर असू शकते, जे वेळेवर तपासणी केल्यास टाळता आले असते. फ्रॅक्चरवर उपचार करण्याइतकेच त्यामागील मूळ कारण ओळखणेही महत्त्वाचे आहे."

या आजाराच्या सुरुवातीच्या टप्प्यात क्वचितच लक्षणे दिसतात. मात्र, उंची हळूहळू कमी होणे, शरीराची पुढे झुकलेली ठेवण किंवा सतत पाठदुखी ही मणक्याच्या फ्रॅक्चरची संभाव्य चिन्हे असू शकतात. बोन मिनरल डेन्सिटी टेस्ट, ज्याला सामान्यतः डेक्सा स्कॅन म्हणतात, ऑस्टिओपोरोसिस ओळखण्यास आणि फ्रॅक्चरचा धोका मोजण्यास मदत करू शकते. ज्यांच्यामध्ये जोखीम घटक आहेत किंवा किरकोळ पडल्यामुळे फ्रॅक्चर झाले आहे, त्यांनी योग्य तपासणीसाठी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

हाडांचे आरोग्य चांगले राखण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक आहेत. पुरेसे कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी असलेला संतुलित आहार, चालण्यासारखा नियमित वजन सहन करणारा व्यायाम तसेच स्नायूंची ताकद आणि शरीराचा समतोल वाढवणारे व्यायाम हाडांची मजबुती टिकवून ठेवण्यास मदत करू शकतात. ऑस्टिओपोरोसिसचे निदान झालेल्या व्यक्तींना त्यांच्या वैयक्तिक गरजांनुसार औषधे आणि जीवनशैलीतील बदल सुचवले जाऊ शकतात. डॉ. शाह पुढे सांगतात, "हाडांच्या आरोग्याला केवळ फ्रॅक्चर झाल्यानंतरच प्राधान्य देऊ नये. जोखीम असलेल्या व्यक्तींची वेळेवर तपासणी, योग्य वैद्यकीय सल्ला आणि उपचार यामुळे गुंतागुंत टाळण्यास आणि हालचाल करण्याची क्षमता टिकवून ठेवण्यास मदत होऊ शकते—विशेषतः वृद्ध व्यक्तींमध्ये."अपोलो हॉस्पिटल्स च्या 'नेहमी खुले. नेहमी सोबत.' या उपक्रमांतर्गत, रुग्णांना रविवारीही बाह्यरुग्ण विभागातील सल्ला, निदानविषयक तपासण्या, प्रतिबंधात्मक आरोग्य तपासण्या आणि फॉलो-अप सल्ला मिळू शकतो. या सेवा रुग्णालयाच्या निर्धारित वेळापत्रकानुसार उपलब्ध असतील. त्यामुळे आठवड्यातील कामाच्या दिवसांतील व्यस्ततेमुळे वैद्यकीय सल्ला घेण्यात अडथळा येऊ नये, यासाठी रुग्ण आणि कुटुंबांना अधिक लवचिकता मिळते.

सिग्मा ॲडव्हान्स्ड सिस्टीम्सला १७४ कोटींची संरक्षण क्षेत्रातील ऑर्डर

नाटोशी संबंधित उत्तर अमेरिकन ग्राहकाकडून १९.७ दशलक्ष अमेरिकी डॉलरचे कंत्राट; २०२७ च्या दुसऱ्या तिमाहीपर्यंत पूर्तता अपेक्षित

■ मुंबई (दै. संध्या)

सिग्मा ॲडव्हान्स्ड सिस्टीम्स लिमिटेड या एरोस्पेस आणि संरक्षण अभियांत्रिकी क्षेत्रातील कंपनीला उत्तर अमेरिकेतील नाटो संरक्षण परिसंस्थेशी संबंधित एका ग्राहकाकडून १९.७ दशलक्ष अमेरिकी डॉलरची (अंदाजे १७४ कोटी रुपये) ऑर्डर मिळाली आहे. ही ऑर्डर १५५ मिमी तोफगोळ्यांसाठी आवश्यक असलेल्या विशेष सहाय्यक उपप्रणालींचे उत्पादन आणि पुरवठा करण्याशी संबंधित आहे. हा करार २०२७ च्या दुसऱ्या तिमाहीपर्यंत पूर्ण होण्याची अपेक्षा कंपनीने व्यक्त केली आहे. या उत्पादनाचे काम कंपनीच्या स्वतःच्या उत्पादन परिसंस्थेत केले जाणार आहे.

मे २०२६ पासून १५५ मिमी तोफगोळ्यांशी संबंधित मिळालेली ही कंपनीची पाचवी ऑर्डर असल्याचे सांगण्यात आले आहे. यामुळे तोफखाना दारुगोळा उत्पादनाच्या विविध टप्प्यांमध्ये कंपनीची उपस्थिती वाढत असल्याचे स्पष्ट होते. सिग्माच्या उत्पादन पोर्टफोलिओमध्ये तोफगोळ्यांचे बाह्य आवरण, फ्यूज, प्रगत बेस-ब्लीड तंत्रज्ञान, लक्ष्यदिशा सुधारण्याचे फ्यूज तंत्रज्ञान आणि सहाय्यक उपप्रणालींचा समावेश आहे. या विविध उत्पादन क्षमतांमुळे कंपनीला संरक्षण क्षेत्रातील ग्राहकांच्या गुंतागुंतीच्या उत्पादनविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी अधिक व्यापक भूमिका बजावता येणार आहे. कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, मे २०२६ मध्ये एम५५७ फील्ड फ्यूजसाठी ११.४ दशलक्ष अमेरिकी डॉलरची ऑर्डर मिळाली होती. त्यानंतर जूनमध्ये एम१०७ शेल बॉडीसाठी २१.९७ दशलक्ष अमेरिकी डॉलरची, तर जुलैमध्ये बेस-ब्लीड शेल बॉडीसाठी १०४.९ दशलक्ष अमेरिकी डॉलरची ऑर्डर मिळाली.

ऑक्टोबरमध्ये कंपनीने म्युनिशन्स इंडिया लिमिटेडसोबत लक्ष्यदिशा सुधारण्याच्या फ्यूज तंत्रज्ञानाचा विकास, एकत्रीकरण आणि स्वदेशी उत्पादन यासंदर्भात सामंजस्य करार केला. आता सहाय्यक उपप्रणालींसाठी मिळालेल्या नव्या ऑर्डरमुळे कंपनीच्या उत्पादन क्षमतेचा विस्तार झाला आहे.

आंतरराष्ट्रीय संरक्षण उत्पादनातील भूमिका बळकट करण्यावर भर

या ऑर्डरमुळे आंतरराष्ट्रीय संरक्षण उत्पादन क्षेत्रातील आपली उपस्थिती अधिक मजबूत करण्याच्या सिग्माच्या धोरणाला चालना मिळणार आहे. विविध घटकांच्या उत्पादनापासून ते अधिक व्यापक उत्पादनविषयक गरजा पूर्ण करण्यापर्यंत कंपनी आपल्या अभियांत्रिकी आणि उत्पादन क्षमतांचा विस्तार करत आहे. या करारावियी बोलताना सिग्मा ॲडव्हान्स्ड सिस्टीम्स लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील कालिदिंदी म्हणाले, "जागतिक संरक्षण क्षेत्रातील ग्राहकांना आता केवळ स्वतंत्र घटकांचा पुरवठा करणाऱ्या कंपन्यांपेक्षा दारुगोळा पुरवठा साखळीतील वाढत्या गुंतागुंतीच्या उत्पादन गरजा पूर्ण करण्यास सक्षम असलेल्या भागीदारांची आवश्यकता आहे. यासाठी सखोल अभियांत्रिकी ज्ञान, सातत्यपूर्ण उत्पादन आणि मोठ्या प्रमाणावर विशेष उत्पादने तयार करण्याची क्षमता आवश्यक आहे."

जागतिक संरक्षण क्षेत्रातील वाढत्या मागणीचा फायदा

रशिया-युक्रेन युद्धानंतर जागतिक स्तरावर तोफखाना दारुगोळ्याची मागणी आणि संरक्षण उत्पादन क्षमता वाढवण्यावर भर दिला जात आहे. नाटो सदस्य देश आणि त्यांचे सहकारी देश दारुगोळ्याचा साठा भरून काढणे, दीर्घकालीन खरेदी करार करणे आणि उत्पादन क्षमता वाढवणे यांसारख्या उपाययोजना करत आहेत. युरोपीय संघाने २०२४ मध्ये ५०० दशलक्ष युरोच्या निधीसह सुरू केलेला 'ॲक्ट इन सपोर्ट ऑफ ॲम्युनिशन प्रोडक्शन' (एएसएपी) हा उपक्रम दारुगोळा उत्पादनातील अडथळे दूर करणे आणि उत्पादन क्षमता वाढवणे या उद्देशाने राबवण्यात आला. या बदलांमुळे संरक्षण उत्पादन क्षेत्रातील विशेष घटक आणि उपप्रणाली पुरवणाऱ्या कंपन्यांसाठी नवीन व्यावसायिक संधी निर्माण होत आहेत.

ते पुढे म्हणाले, "या ऑर्डरमुळे १५५ मिमी तोफगोळा विभागात सिग्माने विकसित केलेल्या क्षमतांना आणखी बळकटी मिळेल. आंतरराष्ट्रीय संरक्षण उत्पादन क्षेत्रातील आमची भूमिका विस्तारण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल आहे. अधिक तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक प्रकल्पांमध्ये सहभागी होणे आणि ग्राहकांच्या बदलत्या गरजा पूर्ण करणे यासाठी आवश्यक क्षमता विकसित करण्यावर आमचा भर आहे. या करारामुळे ग्राहकांशी असलेले संबंध अधिक दृढ करण्यासह व्यापक दारुगोळा उत्पादन क्षेत्रातील योगदान वाढवण्याची संधी मिळणार आहे." एकूणच, नव्या ऑर्डरमुळे सिग्मा ॲडव्हान्स्ड सिस्टीम्सच्या संरक्षण उत्पादन व्यवसायाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. जागतिक स्तरावर संरक्षण उत्पादन क्षमता वाढवण्याच्या प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर कंपनीसाठी हा करार व्यावसायिक विस्ताराच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरू शकतो.



पिंपरी-चिंचवड आणि परिसर
शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६
दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाय... निर्भीड दैनिक

प्रत्येक व्यक्ती एक स्वतंत्र व्यक्तिमत्व : डॉ. देशपांडे

■ पिंपरी (दै. संध्या)



प्रत्येक व्यक्तीचे एक स्वतंत्र व्यक्तिमत्व असते. आपण प्रथम ध्येय ठरवून नियोजन करावे. सर्जनशीलतेचा वापर करून आत्मविश्वासाने सकारात्मक प्रयत्न केले की यश निश्चित मिळते असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. कांचन देशपांडे यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग मधील अंतर्गत तक्रार समितीच्या वतीने 'मी... माझा प्रवास, अनेक भूमिका आणि सुवर्णमध्य' या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सिटी प्राईड स्कूलच्या प्राचार्य डॉ. कांचन देशपांडे यांनी उपस्थितांशी संवाद साधला. कायदा सल्लागार ॲड. परिक्रमा खोत, स्त्री रोग तज्ञ डॉ. क्षमा उपलेंचवार, न्यू एज फायर फायटिंग कंपनी संचालक सुजल शाह, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, उपसंचालक निळकंठ चोपडे, अंतर्गत तक्रार समिती उपाध्यक्ष सहा. प्रा. वृषाली भालेराव, अधिष्ठाता डॉ. शीतल भंडारी आदी उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील उद्योजक नरेंद्र लांडगे अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते. डॉ. क्षमा उपलेंचवार यांनी सांगितले की, अनेक स्त्रिया कुटुंबाची जबाबदारी घेऊन नोकरी, उद्योग व्यवसाय करतात. हे करत असताना त्यांना चिंता, ताणतणाव याचा सामना करावा लागतो, ही समाज व्यवस्था स्त्रियांशिवाय अपुरी आहे. त्यांच्या जीवनात अनेक स्थित्यंतरे येतात. कुटुंबात प्रत्येक नात्याची तसेच नोकरी व्यवसायात प्रत्येक पदाची वेगळी जबाबदारी त्यांना घ्यावी लागते. 'यश' म्हणजे काय, हे शोधून काढा. स्वतःला प्रश्न विचारा, तुमच्या कामात आणि वैयक्तिक आयुष्यात योग्य समतोल ठेवा आणि आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका असे आवाहन डॉ. क्षमा उपलेंचवार यांनी केले. ॲड. परिक्रमा खोत यांनी सांगितले की, जे तुम्हाला योग्य वाटत नाही, त्याविरुद्ध नेहमी आवाज उठवा. केवळ चर्चा करून समानता येत नाही. जिथे गरज वाटेल, तिथे संघर्ष करायला हवा. बदलाची सुरुवात आपल्या घरापासून व्हायला हवी. उद्योजिका सुजल शहा यांनी सांगितले की, तुम्हाला तुमचा मार्ग स्वतःच तयार करावा लागतो. आयुष्य नेहमीच सकारात्मक नसते, आपल्याला नकारात्मकतेलाही सामोरे जावे लागते. नोकरी आणि वैयक्तिक आयुष्य याचा समन्वय साधता आला पाहिजे. प्रास्ताविक करताना अंतर्गत तक्रार समिती उपाध्यक्ष सहा. प्रा. वृषाली भालेराव यांनी सांगितले की, महिलांना वैयक्तिक आयुष्यात समतोल राखताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते. यावर महिलांचे विचार मंथन व्हावे त्यासाठी पीसीसीओई ने खुले व्यासपीठ उपलब्ध करुन दिले आहे. डॉ. वृषाली भालेराव, डॉ. शिल्पा मोटेगावकर यांनी संयोजनात सहभाग घेतला. स्वागत, प्रास्ताविक डॉ. प्रा. शीतल भंडारी, सूत्र संचालन स्नेहा कल्याणकर, आभार डॉ. सोनल गोरे यांनी मानले.

थोडक्यात पण महत्वाचे



टीपी स्कीम रद्द होणार? शेतकऱ्यांच्या विरोधावर पीएमआरडीएचा मोठा निर्णय

पिंपरी: दैनिक संध्या

ग्रामपंचायतींचे ठराव आणि किमान ५० टक्के शेतकऱ्यांचा विरोध असल्यास संबंधित टीपी स्कीम (नगररचना योजना) रद्द करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येईल. शेतकरी व खातेदारांचा विरोध असलेल्या टीपी स्कीम त्यांच्यावर लादल्या जाणार नाहीत, अशी स्पष्ट भूमिका पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी मांडली. 'पीएमआरडीए'चा इनर रिंग रोड प्रकल्प प्राधिकरणाच्या क्षेत्रात पायाभूत सुविधा विकसित करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाकांक्षी आहे. रिंग रोड विकसित झाल्यानंतर त्यालगतचा परिसर विकसित होण्याची शक्यता लक्षात घेता, प्राधिकरणाने हाती घेतलेल्या 'स्ट्रक्चरल प्लानमध्ये या क्षेत्राच्या नियोजनाला विशेष प्राधान्य दिले जाईल. तसेच, पुढील टप्प्यात सविस्तर आराखड्याच्या आधारे विकसनशील विभाग आणि शहरी सुविधांचे नियोजन करण्याचे प्रस्तावित आहे, अशी दिलासादायक माहितीही महानगर आयुक्तांनी या बैठकीत शेतकऱ्यांना दिली. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) वतीने विकसित करण्यात येत असलेल्या ६५ मीटर रुंदीच्या इनर रिंग रोडसंदर्भात मावळ तालुक्यातील गावांमधील शेतकरी आणि ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक सोमवार (दि. १९) 'पीएमआरडीए'च्या आकुर्डी येथील मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात पार पडली. या बैठकीत आयुक्त बोलत होते. या बैठकीला मावळ तालुक्यातील साळुंब्रे, दारुंब्रे, गोडुंब्रे, परंदवाडी, धामणे आणि सांगवडे या सहा गावांचे सरपंच, विविध लोकप्रतिनिधी आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. या वेळी उपस्थितांनी इनर रिंग रोड आणि टीपी स्कीमबाबत आपल्या भावना व आक्षेप मांडले. आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी त्यांची गांभीर्याने दखल घेतली.

पुणे पदवीधर, शिक्षक मतदारसंघात महायुतीचा विजय निश्चित : मुरलीधर मोहोळ



पिंपरी : दैनिक संध्या

भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि भारतीय रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या महायुतीतील पक्षांची पिंपरी-चिंचवड शहरात मोठी ताकद आहे. सर्व मित्रपक्षांत अनुभवी नेते आहेत. महायुतीच्या एकत्रित ताकदीमुळे डॉ. स्मिताताई योगेश जाधव आणि कौस्तुभ गावडे यांचा विजय निश्चित आहे, असा विश्वास केंद्रीय नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सोमवारी (दि.१९) महायुतीच्या मेळाव्यात व्यक्त केला. या मेळाव्यात दोन्ही उमेदवारांच्या विजयाचा संकल्प करण्यात आला. डॉ. स्मिताताई योगेश जाधव, शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार कौस्तुभ गावडे यांच्या प्रचारार्थ आकुर्डी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात महायुतीचा मेळावा उत्साहात पार पडला. यावेळी मोहोळ बोलत होते. व्यासपीठावर आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे, आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे, माजी आमदार विलास लांडे, माजी आमदार अश्विनी जगताप, भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष योगेश बहल, शिवसेनेचे शहरप्रमुख नीलेश तरस, भारतीय रिपब्लिकन पाटी ऑफ इंडियाचे शहराध्यक्ष कुणाल वाव्हळकर, भाजपचे शहर प्रभारी भरत पाटील, उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, शिवसेना गटनेते विश्वजित बारणे, माजी खासदार अमर साबळे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, शिवसेना उपनेत्या सुलभा उबाळे, माजी महापौर संजोग वाघेरे, ॲड. गोरक्ष लोखंडे, भाजप पदवीधर मतदार समन्वयक राजू पिल्ले, सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, विकास डोळस, मधुकर बच्चे, वैशाली खाडये, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, भारतीय रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया मित्रपक्षाचे नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

येत्या काळात जीएसटी प्रणालीमध्ये अमूलग्रा बदल

पिंपरी : दैनिक संध्या

येत्या एप्रिल पासून फेसलेस सिस्टीम हा केंद्र सरकार जीएसटीच्या नियमात अमूलग्रा बदल होणार आहे. असे प्रतिपादन दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (आयएआय)च्या जीएसटी आणि अप्रत्यक्ष कर समितीचे अध्यक्ष उमेश शर्मा यांनी केले. दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया च्या पिं-चिं शाखेच्या वतीने निगडी येथे आयोजित करण्यात आलेल्या "ज्ञानदीपेन निर्माणम २.०" अप्रत्यक्ष कर" या राष्ट्रीय परिषदेच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी रिजनल कौन्सिल मेंबर सीए सीए अभिषेक धामणे, सीए उन्मेश पटवर्धन, डॉ.अशोककुमार पगारिया, शाखेचे अध्यक्ष सीए महावीर कोठारी, उपाध्यक्ष सीए मनोज मालपाणी, सचिव सीए सारिका चोरडिया, माजी अध्यक्ष सीए वैभव मोदी, खजिनदार सीए धीरज बलदोटा आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. प्रास्ताविक भाषण अध्यक्ष महावीर कोठारी यांनी केले. सूत्रसंचालन धीरज बलदोटा तर आभार सारिका चोरडिया यांनी मानले. पहिल्या सत्रात सीए स्वाती आगरवाल, ॲड. रोहीत जैन, सीए सुनील गाभावाला यांनी मार्गदर्शन केले. तर झालेल्या चर्चा सत्रात सीए उमेश शर्मा, सीए सीए अभिषेक धामणे, सीए उन्मेश पटवर्धन, वैभव मोदी, मनोज मालपाणी हे सहभागी झाले होते. जीएसटी मधील होणारे बदल यावर ऊहापोह कारण्यात आला. दुसऱ्या दिवशी ज्येष्ठ विधी तज्ञ डॉ जे.के मित्तल(दिल्ली), ॲड. अभय देसाई (अहमदाबाद),ॲड. अविनाश पोद्दार(सुरत) यांनी जीएसटी मधील कायदेशीर बाबी यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

लोणावळ्यातील टायगर पॉईंटवर मोठी दुर्घटना; दरीत पडून मायलेकी गंभीर जखमी

पिंपरी : दैनिक संध्या

लोणावळ्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या टायगर पॉईंट येथील दरीत पडून आई आणि मुलगी गंभीर जखमी झाले आहेत. स्थानिक दुकानदार आणि नागरिकांच्या प्रसंगावधानामुळे व तातडीच्या मदतीमुळे या दोघींचे प्राण थोडक्यात वाचले आहेत. सोनाली शिवराज गजभार (वय ३७) व मनाली शिवराज गजभार (वय १२) असे या दरीत पडलेल्या माय-लेकींची नावे आहेत. सोमवारी (दि. १९) दुपारी सुमारे १२ वाजता शिवदुर्ग रेस्क्यू टीमला एक फोन आला, ज्यामध्ये टायगर पॉईंटवरून एक महिला आणि लहान मुलगी दरीत पडल्याची माहिती देण्यात आली. ही माहिती मिळताच टीमने तातडीने लोणावळा ग्रामीण पोलिसांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली आणि रुग्णवाहिकेलादेखील पाचारण केले. यानंतर शिवदुर्ग रेस्क्यू टीम, स्थानिक दुकानदार व नागरिकांनी धाडस दाखवत दोरीच्या साहाय्याने खाली उतरून त्या दोघींना सुखरूप वर आणले.

महात्मा फुले महाविद्यालयाबाहेर विद्यार्थ्याला मारहाण; पाच जणांविरोधात गुन्हा दाखल

■ पिंपरी (दै. संध्या)



पिंपरीगाव येथील महात्मा फुले महाविद्यालयाबाहेर झालेल्या वादातून विद्यार्थ्याला मारहाण करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी पिंपरी पोलिस ठाण्यात पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी गौरव उमेश गुप्ता (वय २०, व्यवसाय-शिक्षण, रा. सुदर्शन चौक, पवना मित्र मंडळ, पिंपरीगाव, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी साहिल मनोहर, लकी जावळे, राकेश मोघेड, सागर गायकवाड (रा. भोसरी) आणि निशांत अहिरे (रा. पिंपरी) यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २१ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी गौरव गुप्ता हे महात्मा फुले महाविद्यालयात टीव्ही वाय-फाय कॉमर्सचा पेपर देण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांचा मित्र साकिब अत्तार हा गाडीवरून पेपरसाठी महाविद्यालयात आला होता. पेपर संपल्यानंतर महाविद्यालयाबाहेर गाडी लावत असताना साहिल मनोहर याने फिर्यादीला हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

त्यानंतर लकी जावळे याने फिर्यादीला, "तुला फार खूप मस्ती आली आहे का?" असे म्हणत शिवीगाळ केली. त्यानंतर इतर आरोपींनीही फिर्यादीला हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

यावेळी फिर्यादीचा मित्र साकिब अत्तार हा त्यांना वाचवण्यासाठी आला असता त्यालाही मारहाण करण्यात आली. तसेच फिर्यादीच्या हातातील रॉडने त्यांच्या मोबाइलवर मारून मोबाइलचे नुकसान करण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी पिंपरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस करीत आहेत.

सांगवीत स्मार्ट वॉटर मीटरवरून वाद; नागरिकांच्या विरोधानंतर काम थांबवले

■ सांगवी : (दै. संध्या)



जुनी व नवी सांगवीत अनेक महिन्यांपासून गढूळ पाणी, अनियमित पाणीपुरवठा, कमी दाबाने पाणी येणे आणि पाणीकपात अशा विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अद्याप पूर्णपणे सुटलेला नसताना आता सांगवीत स्मार्ट वॉटर मीटर बसवण्याच्या मोहिमेमुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. विशेष म्हणजे, नागरिकांना विश्वासात न घेता आणि पूर्वसूचना न देता जुन्या मीटरच्या जागी नवीन स्मार्ट मीटर बसवले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. जुनी सांगवीतील मधुबन सोसायटी परिसरात स्मार्ट वॉटर मीटर बसवण्याचे काम सुरू असताना नागरिक आणि कंत्राटदार यांच्यात तणाव निर्माण झाला. नागरिकांच्या विरोधानंतर या कामाबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले असून, पाणीपुरवठ्याच्या मूलभूत समस्या सोडवण्याऐवजी नव्या योजनेवर खर्च कशासाठी, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

गेल्या वर्षभरापासून सांगवी परिसरातील नागरिकांकडून पाण्याच्या गुणवत्तेबाबत तक्रारी केल्या जात आहेत. पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता करण्यात आल्यानंतर काही प्रमाणात पाण्याच्या गुणवत्तेत सुधारणा झाल्याचे नागरिक सांगतात. मात्र, त्यानंतरही पाणीकपात, अनियमित पुरवठा आणि कमी दाबाने पाणी येण्याच्या समस्या कायम असल्याची त्यांची तक्रार आहे. सांगवीच्या तुलनेत पिंपळे गुरव परिसरात चांगला पाणीपुरवठा होत असल्याची भावना अनेक नागरिक व्यक्त करतात.

मावळात पदवीधर, शिक्षक मतदारसंघासाठी ३,४९९ मतदार; १२ मतदान केंद्रे सज्ज

■ वडगाव मावळ (दै. संध्या)



विधान परिषदेच्या पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी मावळ तालुक्यात प्रशासकीय यंत्रणा सज्ज असून, मावळात पदवीधरसाठी २,६७९ ते शिक्षकसाठी ८२० असे एकूण ३ हजार ४९९ मतदार आहेत. मतदानासाठी १२ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे, अशी माहिती तहसीलदार विक्रम देशमुख व निवडणूक नायब तहसीलदार अमोल पाटील यांनी दिली.

या निवडणुकीसाठी शुक्रवारी (दि. २३) सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान प्रक्रिया होणार असून, २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे. मावळ तालुक्यात पदवीधर मतदारसंघासाठी एकूण २ हजार ६७९ मतदार आहेत. यामध्ये १ हजार ५६४ पुरुष आणि १ हजार ११५ महिला मतदारांचा समावेश आहे. या मतदारांसाठी तालुक्यात सात मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. शिक्षक मतदारसंघात मावळ तालुक्यात एकूण ८२० मतदार असून, त्यात ४१२ पुरुष आणि ४०८ महिला मतदारांचा समावेश आहे. या मतदारांसाठी पाच मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. पदवीधरसाठी पवनानगर येथील पवना उच्च माध्यमिक विद्या मंदिर, लोणावळा येथील ऑक्झिलियम कॉन्व्हेन्ट हायस्कूल, कामशेत येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आणि वडगाव येथील न्यू इंग्लिश स्कूल येथे प्रत्येकी एक मतदान केंद्र असेल. तसेच, तळेगाव दाभाडे येथील थोर समाजसेवक नथुभाऊ भेगडे शाळा क्रमांक १ येथे तीन मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. शिक्षकसाठी पवनानगर येथील पवना उच्च माध्यमिक विद्या मंदिर, लोणावळा येथील ऑक्झिलियम कॉन्व्हेन्ट हायस्कूल, वडगाव येथील न्यू इंग्लिश स्कूल आणि तळेगाव दाभाडे येथील थोर समाजसेवक नथुभाऊ भेगडे शाळा क्रमांक १ येथे प्रत्येकी एक मतदान केंद्र असणार आहे.

लाडशाखीय वाणी समाज विकास मंडळाच्या वतीने १६ कुलस्वामिनी व कानुबाई मातेचा जागर सोहळा उत्साहात संपन्न

■ पिंपरी (दै. संध्या)



भव्य नवरात्रोत्सव २०२६ अंतर्गत सातव्या माळेच्या पावन पर्वानिमित्त लाडशाखीय वाणी समाज विकास मंडळ, पिंपरी-चिंचवड शहर यांच्या वतीने आयोजित १६ कुलस्वामिनी व कानुबाई मातेचा जागर आणि होमहवन सोहळा अत्यंत भक्तिमय व मंगलमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला.

वैदिक मंत्रोच्चार, पवित्र अग्नीत अर्पण केलेल्या आहुती आणि १६ कुलस्वामिनी व कानुबाई मातेच्या भक्तिगीतांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. मनोजजी ब्राह्मणकार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सोहळ्याची सुरुवात होमहवनाने झाली. त्यानंतर पालखीचे आगमन, देवीचा जयघोष आणि भक्तिमय वातावरणाने कार्यक्रमाला विशेष आध्यात्मिक उंची प्राप्त झाली. समाजातील एकोपा, परंपरांचे जतन आणि कुलस्वामिनी मातेच्या भक्तीत रमण्याचा हा सोहळा सर्वांसाठी अविस्मरणीय ठरला. या मंगलमय कार्यक्रमाला 'देऊळबंद-२'चे निर्माते आदरणीय कैलास वाणी आणि नामांकित सनदी लेखापाल सी.ए. निलेश येवलेकर यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच आमदार शंकर जगताप, मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग बारणे, भाजपा जिल्हाध्यक्ष शत्रुघ्न काटे, नगरसेवक राहुल कलाटे, नगरसेविका रेश्मा भुजबळ, अर्चना तापकीर, योगिता बारणे, अरुण वाणी, नगरसेवक नाना काटे आणि पुणे विवाह परिचय संमेलनाचे अध्यक्ष राजेंद्र महालपुरे, संजय भामरे, यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवली.

सोळा कुलस्वामिनी मातेच्या चरणी भक्तिभावाने नतमस्तक होत समाजबंधू-भगिनींनी देवीच्या जयघोषात आणि गरब्याच्या तालावर उत्सवाचा मनमुराद आनंद लुटला. पारंपरिक वेशभूषा, उत्साहाने भरलेले वातावरण आणि समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे संपूर्ण सोहळा अधिकच रंगतदार झाला. कानुबाई फ्रेंड्स सर्कल ग्रुपच्या सादरीकरणासह सागर देशमुख यांच्या सुमधुर गायनाने कार्यक्रमात भक्ती आणि आनंदाचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

जगाला युद्धाची नव्हे, बुद्धांच्या शांती, समता आणि करुणेची गरज : त्रिभुवन

■ पिंपरी (दै. संध्या)



जगभरात युद्ध, द्वेष आणि हिंसाचाराचे सावट असताना मानवतेच्या कल्याणासाठी भगवान गौतम बुद्धांचा शांती, करुणा आणि बंधुभावाचा विचार आत्मसात करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन नगरसेवक बाबासाहेब त्रिभुवन यांनी केले.

रहाटणी येथील आनंद बुद्ध विहारात ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना त्रिभुवन यांनी बुद्धांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले की, आज जगात विविध देशांमधील संघर्ष, हिंसाचार आणि सत्तासंघर्षामुळे मानवतेसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. अशा परिस्थितीत भगवान गौतम बुद्धांनी दिलेला शांती, करुणा, प्रज्ञा आणि बंधुभावाचा संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो. युद्ध आणि द्वेषातून प्रश्न सुटत नाहीत; तर संवाद, सहिष्णुता आणि परस्पर आदरातून शांततेचा मार्ग निर्माण होतो.

विहाराचे सचिव पोपट कदम बोलताना म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्ध धम्माचा स्वीकार करून समाजाला समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुतेचा मार्ग दाखवला. त्यांचे विचार आचरणात आणून अन्यायमुक्त आणि समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी प्रत्येकाने योगदान द्यावे.

कार्यक्रमाला आनंद बुद्ध विहाराचे अध्यक्ष महादेव कांबळे, सचिव पोपट कदम, प्राध्यापक प्रभाकर दाभाडे, महिला अध्यक्षा अनिता साळवी, समता सैनिक दलाच्या कमांडर अंजना कांबळे, खजिनदार शशिकांत शेलार, संघटक सखाराम कांबळे, मनोहर लांडगे, प्रकाश सूर्यवंशी, शांता कांबळे, अलका लांडगे, सुमन मूळ, निर्मला कदम, संगीता साळवे, प्रवीण लोखंडे, श्रीमंत कदम, रामभाऊ मुळे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

थोडक्यात पण महत्वाचे



शिरूर पोलिसांची अवैध दारू विक्री व वाहतुकीविरुद्ध धडक कारवाई!

कवठे येमाई : दैनिक संध्या

शिरूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैध दारू विक्री, बेकायदा वाहतूक आणि हद्दपार आदेशाचा भंग करणाऱ्यांविरुद्ध शिरूर पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. दि. १९ ऑक्टोबर रोजी केलेल्या या कारवाईत चार स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून, देशी-विदेशी दारू, हातभट्टीची दारू, एक चारचाकी व एक दुचाकी वाहन असा एकूण २ लाख ८५ हजार ९२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे अवैध दारू विक्री व वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. शिरूर शहरातील बाबुरावनगर, जिल्हा परिषद रोड, भाजीबाजार चौक परिसरात महादेव जिलबीच्या पाठीमागे तुषार शहाजी ठिटे (वय २८, रा. श्रम साफल्य निवास, बाबुराव नगर, शिरूर) याच्याकडे विक्रीच्या उद्देशाने पाच लिटर हातभट्टीची दारू आढळून आली. या दारूची किंमत ५०० रुपये आहे. याप्रकरणी शिरूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर क्रमांक ९४०/२०२६ अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस कॉन्स्टेबल सुशील चंद्रकांत सुरवसे यांनी फिर्याद दिली असून, पोलीस हवालदार मोरे पुढील तपास करीत आहेत. शिरूर येथील गोलेगाव रोडवरील पुणे-नगर बाजूकडील सर्व्हिस रोडवर ज्ञानेश्वर जबाजी कवाड (वय ४१, रा. निघोज, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) हा ग्रे रंगाच्या मारुती वॅगनआरमधून देशी-विदेशी दारूची बेकायदा वाहतूक करताना आढळून आला. पोलिसांनी २ लाख २५ हजार रुपये किमतीची चारचाकी गाडी तसेच देशी दारूच्या १४४ बाटल्या, रॉयल स्टॅगच्या १८, इम्पीरियल ब्लूच्या ६० आणि क्लासिक गोल्डच्या ४८ बाटल्या असा एकूण २ लाख ६१ हजार ४२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.या प्रकरणी गुन्हा रजिस्टर क्रमांक ९४२/२०२६ अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(अ) व ६५(ई) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक राकेश ज्ञानदेव मुळीक यांनी फिर्याद दिली असून, पोलीस हवालदार शिंदे पुढील तपास करीत आहेत. शिरूरमधील बी. जे. कॉर्नर परिसरात हेमाराम देवाराम देवासी (वय ४०, रा. बेलवंडी फाटा, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) हा काळ्या रंगाच्या हिरो होंडा स्प्लेंडर मोटारसायकलवरून देशी दारूची बेकायदा वाहतूक करताना आढळला. पोलिसांनी २० हजार रुपये किमतीची मोटारसायकल आणि चार हजार रुपये किमतीच्या देशी दारूच्या १०० सीलबंद बाटल्या असा एकूण २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी गुन्हा रजिस्टर क्रमांक ९४३/२०२६ अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(अ) व ६५(ई) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक राकेश ज्ञानदेव मुळीक यांनी फिर्याद दिली असून, पोलीस हवालदार खबाले तपास करीत आहेत. शिरूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत पेट्रोलिंग सुरू असताना शरद बन्सी मल्लाव (वय २८, रा. काची आळी, शिरूर) हा हुडको कॉलनी परिसरात आढळून आला.

शिरूर पोलिसांची सरदवाडीतील राजहंस लॉजवर धडक कारवाई!

कवठे येमाई : दैनिक संध्या

शिरूर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील सरदवाडी येथील राजहंस लॉजवर शिरूर पोलिसांनी कारवाई करत अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायद्यांतर्गत तिघांना अटक केली आहे. लॉजमध्ये एका महिलेकडून वेश्याव्यवसाय करवून घेतला जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी दि. १९ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६.२० वाजता ही कारवाई केली. या कारवाईत संबंधित महिलेला सुरक्षित ताब्यात घेण्यात आले असून, घटनास्थळावरून रोख रक्कम, कंडोमची पाकिटे आणि ग्राहकांच्या नोंदी असलेले रजिस्टर जप्त करण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी संबंधित महिलेला वेश्याव्यवसाय करण्यास प्रवृत्त केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी शिरूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर क्रमांक ९४४/२०२६ अन्वये अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायदा, १९५६ मधील कलम ३ व ४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईदरम्यान महिलेला महिला पोलिसांच्या मदतीने सुरक्षिततेच्या दृष्टीने ताब्यात घेण्यात आले. घटनास्थळावरून एक हजार रुपये रोख रक्कम, ८० रुपये किमतीची न वापरलेली कंडोमची आठ पाकिटे आणि ग्राहकांच्या नोंदी असलेले रजिस्टर असा एकूण १ हजार ८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. १. अनिल किसन डांगे (वय ४२, रा. इंदिरानगर, शिरूर, जि. पुणे). २. सचिन महादेव जाधव (वय ३७, रा. राजहंस लॉज, सरदवाडी, ता. शिरूर, जि. पुणे). ३. पिंटू दोरगे (पूर्ण नाव माहीत नाही, रा. सरदवाडी, ता. शिरूर, जि. पुणे). या गुन्ह्याची नोंद पोलीस हवालदार पवार (बक्कल क्रमांक ३९८) यांनी केली असून, पोलीस कॉन्स्टेबल रविंद्र तात्याबा काळे यांनी फिर्याद दिली आहे. पोलीस उपनिरीक्षक चव्हाण या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.सरदवाडी येथील राजहंस लॉजवर करण्यात आलेल्या या कारवाईमुळे परिसरात चर्चा सुरू झाली आहे. अनैतिक मानवी व्यापारासारख्या गंभीर प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी केलेल्या या कारवाईकडे लक्ष वेधले जात आहे.

२८ वर्षीय तरुणाचा मृत्यू; तर उत्तर प्रदेशातील व्यक्तीचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू

कवठे येमाई : दैनिक संध्या

शिरूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत दि. १९ ऑक्टोबर २०२६ रोजी दोन वेगवेगळ्या अकस्मात मृत्यूंच्या घटनांची नोंद करण्यात आली आहे. यामध्ये साईनगर येथील एका २८ वर्षीय तरुणाचा गळफास घेतल्याने मृत्यू झाला, तर उत्तर प्रदेशातील एका व्यक्तीचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची नोंद पोलिसांनी केली आहे. शिरूर शहरातील साईनगर येथे अजय विलास घोलप (वय २८, रा. साईनगर, शिरूर, जि. पुणे) याचा दि. १९ ऑक्टोबर रोजी दुपारी सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास राहत्या घरातील बाथरूममध्ये ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आल्याची घटना घडली. घटनेची माहिती मिळाल्यानंतर नातेवाईक व स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्याला खाली उतरविण्यात आले. त्यानंतर पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी रुग्णवाहिकेची व्यवस्था केली. अजय याला ग्रामीण रुग्णालय, शिरूर येथे नेण्यात आले असता, डॉक्टरांनी तपासून उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले.या प्रकरणी मयताचे वडील विलास मोतीराम घोलप (वय ५५, रा. साईनगर, शिरूर) यांनी पोलिसांना खबर दिली. त्यानुसार शिरूर पोलीस स्टेशनमध्ये अकस्मात मृत्यू रजिस्टर क्रमांक १७५/२०२६ अन्वये भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १९४ नुसार नोंद करण्यात आली आहे. दुसऱ्या घटनेत बाबुराम रामनारायन (रा. पेंडारी खुर्द, पोस्ट नरायनपुर, जिल्हा संतकबीर नगर, उत्तर प्रदेश) यांचा दि. १९ ऑक्टोबर रोजी दुपारी सुमारे १२.४५ वाजण्याच्या सुमारास मृत्यू झाल्याची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणात मृत्यूचे कारण हृदयविकाराचा झटका असे नमूद करण्यात आले आहे. या घटनेची खबर अक्षय एकनाथ गायकवाड (वय २९, व्यवसाय टेलरिंग, रा. रंभेनगरी, शिरूर, जि. पुणे यांनी दिली. त्यानुसार शिरूर पोलीस स्टेशनमध्ये अकस्मात मृत्यू रजिस्टर क्रमांक १७६/२०२६ अन्वये भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १९४ नुसार नोंद करण्यात आली आहे.या दोन्ही घटनांप्रकरणी शिरूर पोलीस स्टेशनमार्फत पुढील तपास सुरू आहे.

चाकण परिसरात भरगच्च उपक्रमांनी दसरा सण साजरा

■ चाकण (दै. संध्या)

साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानल्या जाणाऱ्या विजयादशमी अर्थात दसरा सणाचा उत्साह चाकण शहर व परिसरात मोठ्या प्रमाणात पाहायला मिळाला. पारंपरिक धार्मिक विधी, ऐतिहासिक वारशाचे दर्शन, दुर्गामाता महादौड आणि सामाजिक उत्साहाच्या वातावरणात येथील व्यापारी व नागरिकांनी दसरा सण उत्साहात साजरा केला. शहरातील विविध कार्यक्रमांमुळे चाकणमध्ये दिवसभर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.


संग्राम दुर्ग किल्ल्यात शिवकालीन शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. शिवकालीन शस्त्रास्त्रे व ऐतिहासिक साहित्याचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आल्याने सर्वत्र नवचैतन्य निर्माण झाले होते.

या प्रदर्शनात तलवारी, भाले आणि शिवकालीन युद्धपरंपरेची माहिती देणाऱ्या साहित्याच्या माध्यमातून इतिहासप्रेमींना मराठ्यांच्या शौर्याची आणि पराक्रमाची माहिती अनुभवता आली. ऐतिहासिक वारशाची जपणूक करणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असल्याचे किल्ले संग्रामदुर्ग प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. किरण झिंजुरके यांनी सांगितले. किल्ल्यावरील या प्रदर्शनामुळे नव्या पिढीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाची ओळख करून देण्याची संधी उपलब्ध झाली.

विजयादशमीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरणही उत्साहपूर्ण पाहायला मिळाले. शिवसेना तथा उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या दसरा मेळाव्यासाठी चाकण व परिसरातील शिवसैनिक मोठ्या उत्साहात मुंबईच्या दिशेने रवाना झाले होते.

मेळाव्याला उपस्थित राहण्यासाठी कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. पक्षाचे विचार आणि संघटनात्मक ताकद दाखविण्याच्या दृष्टीने या मेळाव्याला शिवसैनिकांच्या प्रमुख उपस्थितीने विशेष महत्त्व असल्याचे चित्र दिसून आले.

दुर्गामाता महादौडला तरुणाईचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दसरा उत्सवाच्या निमित्ताने चाकण परिसरात



आयोजित करण्यात आलेल्या दुर्गामाता महादौडमध्ये तरुण-तरुणींसह नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या उपक्रमातून धार्मिक श्रद्धा, सामाजिक एकजूट आणि सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडले. महादौडमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. आपट्याची पाने देत 'सोने' लुटण्याची परंपरा कायम राखण्यात आली. विजयादशमीच्या दिवशी सायंकाळी चाकणच्या मुख्य बाजारपेठेसह शहरातील विविध भागांत नागरिकांनी एकमेकांना आपट्याची पाने देऊन दसऱ्याच्या शुभेच्छा दिल्या. आपट्याची पाने म्हणजेच प्रतीकात्मक सोने देण्याच्या पारंपरिक प्रथेमुळे नागरिकांमध्ये आनंदाचे आणि आपुलकीचे वातावरण पाहायला मिळाले. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी एकमेकांची भेट घेत शुभेच्छांची देवाणघेवाण केली.एकंदरीत, चाकणमध्ये विजयादशमीचा सण ऐतिहासिक वारशाचे स्मरण, धार्मिक परंपरा, राजकीय घडामोडी आणि सामाजिक एकजुटीच्या संगमातून उत्साहात साजरा झाला. संग्राम दुर्गावरील शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन, दुर्गामाता महादौड आणि आपट्याची पाने देण्याच्या परंपरेमुळे यंदाच्या दसरा उत्सवाला विशेष रंगत आली होती.

चाकण येथे १ नोव्हेंबरला वधू वर परिचय मेळावा

■ चाकण (दै. संध्या)

माळी समाजातील विवाहेच्छुक युवक-युवतींना विवाहासाठी योग्य जोडीदार निवडता यावा, तसेच समाजातील कुटुंबांना एकमेकांशी परिचय साधण्याची संधी मिळावी, या उद्देशाने श्री संत सावता माळी वधू-वर सूचक मंडळ यांच्या वतीने चाकण येथे रविवारी (दि. १ नोव्हेंबर) भव्य राज्यस्तरीय माळी समाज वधू-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. येथील भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालयात वरील नियोजित दिवशी सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून समाजातील विवाहेच्छुक वधू-वरांना आपला परिचय करून देण्याची, तसेच पालकांना आपल्या मुला-मुलींसाठी योग्य स्थळ शोधण्याची संधी उपलब्ध होणार आहे. राजेंद्र घुमटकर, तुकाराम कांडगे, शोभा शेवकरी, मीना गोरे, गोरक्षनाथ कांडगे, बबनराव टिळेकर, ज्योती वाघ, रूपाली जाधव, मंगल गोरे, मंगल जाधव, रमेश वाघ, प्रियंका शेवकरी, पल्लवी लेंडघर आदींनी या परिचय मेळाव्याचे आयोजन केले आहे.

नाव नोंदणीसाठी राजेंद्र घुमटकर, शोभा शेवकरी, रमेश वाघ, जीवन बुर्डे, शुभांगी आगरकर व स्वाती गवते यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन नगराध्यक्षा मनिषा गोरे व सुदाम दरवडे यांनी केले आहे. वधु वर परिचय मेळाव्याचे उदघाटन आमदार बाबाजी काळे, दिलीप मोहिते, रामभाऊ कांडगे, शांताराम घुमटकर, महेंद्र गोरे, डॉ. अंकुश जाधव आदींच्या हस्ते होणार आहे. उद्योजक भरत कानपिळे, नगरसेविका ॲड. वर्षा शेवकरी, नथूभाऊ गोरे व रामदास जाधव आदींच्या विशेष सहकार्याने हा कार्यक्रम होणार आहे.

आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत विवाहासाठी योग्य स्थळ शोधताना अनेक कुटुंबांना विविध अडचणींचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत एकाच व्यासपीठावर समाजातील विवाहेच्छुक युवक-युवती आणि त्यांचे पालक एकत्र आल्यास स्थळ शोधण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होऊ शकते. याच सामाजिक जाणिवेतून या राज्यस्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे शोभा शेवकरी, मीना गोरे व गोरक्षनाथ कांडगे यांनी सांगितले. आयोजकांच्या वतीने उपस्थितांना चहा, पाणी, नाश्ता आणि जेवणाची मोफत व्यवस्था करण्यात आली आहे. माळी समाजातील विवाहेच्छुक युवक-युवतींसह त्यांच्या पालकांनी या मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रुपाली कांडगे, नगरसेवक मंगेश कांडगे, उद्योजक गोरक्षनाथ कांडगे, राहुल कांडगे, किरण कांडगे व ॲड. सुयोग शेवकरी आदींनी केले आहे.

डॉ. मेहबूब सैय्यद यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान

■ चाकण (दै. संध्या)



टीएसपीएल उद्योग समूहाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. मेहबूब सैय्यद यांना ग्लोबल इकॉनॉमिक फोरम समिट २०२६ मध्ये इमर्जिंग बिझनेस लीडर इंटरनॅशनल अवॉर्डने सन्मानित करण्यात आले.

डॉ. सैय्यद यांचा हा बाविसावा आंतरराष्ट्रीय पुरस्कार असून, या सन्मानामुळे टीएसपीएल ग्रुपच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. मलेशियातील जोहोर बाहरू येथील शेरेटन सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या एका भरगच्च कार्यक्रमात त्यांना हा पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. उद्योग क्षेत्रातील योगदान, दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व आणि उत्कृष्टतेप्रती असलेली बांधिलकी यांची दखल घेऊन डॉ. सैय्यद यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले. टीएसपीएल ग्रुप रोजगार निर्मिती, मनुष्यबळ व्यवस्थापन आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून विविध उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचे कार्य करीत आहे. कंपनीच्या कार्याला आणि नेतृत्वाला मिळालेली ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यता संस्थेसाठी महत्त्वपूर्ण ठरली आहे.

नारायणगावात रोटरी क्लबच्या वतीने वाहतूक जनजागृती रॅली



■ नारायणगाव(दै. संध्या)

वाहनचालक आणि नागरिकांमध्ये वाहतुकीच्या नियमांविषयी जागरूकता निर्माण व्हावी, तसेच रस्ते अपघातांचे प्रमाण कमी व्हावे, या उद्देशाने रोटरी क्लब ऑफ नारायणगाव आणि रोटरी क्लब ऑफ नारायणगाव हायवे यांच्या संयुक्त विद्यमाने वाहतूक जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.


'रोड रॅली अँड सिग्नल शो फॉर ट्रॅफिक अवेअरनेस' या उपक्रमात नारायणगाव पोलीस ठाण्याचे कर्मचारी, जय हिंद इंटरनॅशनल स्कूल, कुरण आणि अनंतराव इंग्लिश मीडियम स्कूल, नारायणगाव येथील सुमारे १४० विद्यार्थी सहभागी झाले होते. या वेळी विद्यार्थ्यांनी वाहतुकीचे नियम पाळण्याचे, अपघात टाळण्याचे आणि सुरक्षित जीवन जगण्याचे आवाहन नागरिकांना केले. रोटरी क्लब ऑफ नारायणगावचे अध्यक्ष अमित बेनके यांनी सांगितले की, अशा जनजागृती उपक्रमांमुळे वाहतूक नियंत्रणासाठी पोलिसांना सहकार्य मिळते. तसेच नागरिकांमध्ये नियमांविषयी जागरूकता वाढून रस्ते अपघात रोखण्यास मदत होते.पोलीस उपनिरीक्षक जगदीश पाटील यांनी, या मोहिमेमुळे एखाद्या व्यक्तीचा जीव वाचला, तरी या उपक्रमाचे खरे सार्थक होईल, असे मत व्यक्त केले. रोटरी क्लब ऑफ नारायणगाव हायवेचे अध्यक्ष बाळासाहेब ढमाले यांनी वाहतुकीच्या नियमांची जाणीव निर्माण करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

शिरूर तालुक्यात तीन वेगवेगळ्या प्रकरणांची पोलिसांत नोंद, आलेगाव पागा येथे वीजचोरीचा गुन्हा

■ कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत वीजचोरी, वनक्षेत्रात वृद्धाचा मृत्यू आणि तरुण बेपत्ता झाल्याची अशी तीन वेगवेगळी प्रकरणे समोर आली आहेत. याप्रकरणी पोलिसांनी वीजचोरी व अपहरणाचा संशय व्यक्त करण्यात आलेल्या प्रकरणात गुन्हे दाखल केले असून, वृद्धाच्या मृत्यूप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित प्रकरणांचा तपास सुरू आहे.

शिरूर तालुक्यातील आळेगाव पागा येथील वाघमोडे वस्तीवर वीजमीटर बायपास करून अनधिकृतपणे वीज वापरल्याप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २९ जून २०२६ रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडल्याचे तक्रारीत नमूद आहे. वीजग्राहक भाऊसो पोपट वाघमोडे आणि वीज वापरणारे मुनसाब अली यांनी वीजमीटर बायपास करून मागील एका महिन्यात ८९८ युनिट विजेचा अनधिकृत वापर केल्याचा आरोप आहे. यामुळे



महावितरण कंपनीचे अंदाजे १५ हजार ९० रुपये आर्थिक नुकसान झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तसेच एक लाख रुपये तडजोडीची रक्कम अद्याप भरलेली नसल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी महावितरणच्या पुणे ग्रामीण येथील भरारी पथकातील कर्मचारी जयंत धनराज गेटमे (वय ४९) यांनी फिर्याद दिली आहे. शिरूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर क्रमांक ९२२/२०२६ अन्वये भारतीय विद्युत कायदा २००३ मधील कलम १३५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस हवालदार शिंदे पुढील तपास करीत आहेत.

शिरूर तालुक्यातील आमदाबाद गावच्या हद्दीतील वन मारुती मंदिराजवळील वनक्षेत्रात विठ्ठल पांडुरंग खरमाळे (वय ७५, रा. खरमाळे वस्ती, निमगाव भोगी, ता. शिरूर) यांचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे.दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०.४६ वाजण्याच्या सुमारास सुरेश विठ्ठल खरमाळे (वय ५१) यांना नितीन थोरात यांचा फोन आला. वन मारुती मंदिराजवळील वनक्षेत्रात लिंबाच्या झाडाला एका व्यक्तीने गळफास घेतल्याची माहिती त्यांना देण्यात आली. त्यानंतर सुरेश खरमाळे यांनी आपल्या भावासह घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, संबंधित व्यक्ती आपले वडील विठ्ठल पांडुरंग खरमाळे असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांना माहिती देण्यात आली.खबर देणाऱ्यांनी मृत्यूबाबत कोणताही संशय नसल्याचे नमूद केले आहे. या प्रकरणी शिरूर पोलीस स्टेशनमध्ये अकस्मात मृत्यू रजिस्टर क्रमांक १७४/२०२६ अन्वये भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १९४ नुसार नोंद करण्यात आली आहे.

पदवीधरांच्या मनात कोण? पुणे पदवीधर मतदारसंघात कोण मारणार बाजी?

■ कोरेगावमुळ (दै. संध्या)

पुणे पदवीधर मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वर्तुळात हालचालींना वेग आला असून, पदवीधरांच्या मनात नेमके कोण आहे, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. राजकीय पक्षांकडून निवडणुकीची तयारी, मतदारांशी संपर्क आणि संघटनात्मक बांधणीवर भर दिला जात असताना, या निवडणुकीत कोण बाजी मारणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या पाच जिल्ह्यांचा समावेश होतो. त्यामुळे या मतदारसंघातील निवडणूक केवळ एका शहरापुरती मर्यादित नसून, पाच जिल्ह्यांतील पदवीधर मतदारांचा विचार आणि त्यांच्या अपेक्षा महत्त्वाच्या ठरणार आहेत.

पदवीधरांचे प्रश्न ऐरणीवर - शिक्षण पूर्ण करुनही रोजगाराच्या संधींसाठी संघर्ष करणारे तरुण, स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी, खासगी क्षेत्रातील कर्मचारी, स्वयंरोजगार करु इच्छिणारे तरुण आणि विविध क्षेत्रांत कार्यरत असलेले पदवीधर यांच्या अपेक्षा या निवडणुकीत महत्त्वाच्या ठरु शकतात. रोजगारनिर्मिती, कौशल्यविकास, सरकारी भरती प्रक्रिया, शिक्षणानंतरच्या संधी आणि पदवीधरांच्या प्रश्नांना शासनदरबारी प्रभावीपणे मांडण्याची क्षमता हे मुद्दे मतदारांच्या चर्चेत राहण्याची शक्यता आहे. राजकीय पक्षांसमोर मतदारांपर्यंत पोहोचण्याचे आव्हान-पुणे पदवीधर मतदारसंघासाठी भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसचे विविध गट, काँग्रेस तसेच इतर पक्ष आणि संभाव्य अपक्ष उमेदवारांच्या हालचालींकडे राजकीय निरीक्षकांचे लक्ष आहे. उमेदवाराची शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील कामगिरी, पदवीधरांशी असलेला संपर्क, प्रश्न सोडविण्यासाठी केलेले प्रयत्न आणि भविष्यातील भूमिका या बाबींच्या आधारे मतदार आपला निर्णय घेऊ शकतात.


मात्र, केवळ राजकीय समीकरणे किंवा पक्षीय ताकद यांवरच निवडणुकीचे चित्र अवलंबून राहणार नाही. मतदारांशी सातत्याने संपर्क ठेवणारा, त्यांच्या समस्या समजून घेणारा आणि त्या सोडविण्यासाठी ठोस भूमिका मांडणारा उमेदवार मतदारांच्या चर्चेत राहू शकतो. मतदार नोंदणीचा मुद्दाही चर्चेत - पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत मतदान करण्यासाठी नियमानुसार मतदार यादीत नाव असणे आवश्यक आहे.

पुणे जिल्हा प्रशासनाने १२ ऑक्टोबर २०२६ रोजी पुणे विभाग पदवीधर मतदारसंघाची एकत्रित मतदार यादी प्रसिद्ध केल्याची माहिती अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यामुळे मतदारांनी आपले नाव यादीत तपासणे महत्त्वाचे आहे.

कोण मारणार बाजी? - पुणे पदवीधर मतदारसंघात कोणत्या पक्षाचा उमेदवार मतदारांचा विश्वास संपादन करणार, कोणाचे संघटन प्रभावी ठरणार आणि पदवीधरांच्या प्रश्नांना कोण प्राधान्य देणार, यावर निवडणुकीतील राजकीय चर्चा केंद्रित होत आहे. प्रत्यक्ष निकालाबाबत ठोस निष्कर्ष काढण्यासाठी मतदानाची स्थिती, उमेदवारांची अधिकृत माहिती आणि मतदारांचा प्रत्यक्ष कौल महत्त्वाचा ठरणार आहे. एकूणच, पुणे पदवीधर मतदारसंघात राजकीय गणिते, उमेदवारांची तयारी आणि पदवीधरांच्या अपेक्षा यांची कसोटी लागणार आहे. त्यामुळे 'पदवीधरांच्या मनात कोण?' आणि 'पुणे पदवीधर मतदारसंघाचा कोण मारणार बाजी?' या प्रश्नांची उत्तरे निवडणुकीच्या पुढील घडामोडींतून स्पष्ट होतील.



दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील

मंत्री मंगलप्रभात लोढा : रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, गाव तिथे उद्योजक इनक्यूबेशन कौन्सिल आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर यांच्यासोबत सामंजस्य करार

■ मुंबई(दै. संध्या)

'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज' स्पर्धेत राज्यातील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे तसेच महाराष्ट्रातील तरुण नवोन्मेषक, विद्यार्थी आणि ग्रामीण भागातील स्टार्टअप्सना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर अंतर्गत कार्यरत असलेली गाव तिथे उद्योजक इनक्यूबेशन कौन्सिल (जीटीयूआयसी) यांच्यात सामंजस्य करार झाला. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या प्रमुख उपस्थितीत या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असल्याचे मंत्री लोढा यांनी सांगितले.

कौशल्य मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील तळागाळातील नवकल्पनांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. 'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज' स्पर्धेच्या माध्यमातून सामाजिक समस्यांवर तंत्रज्ञानाधारित प्रभावी उपाय शोधण्यासाठी अधिकाधिक स्पर्धकांचा सहभाग वाढविणे हा या कराराचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमांतर्गत संपूर्ण महाराष्ट्रात, विशेषतः शैक्षणिक संस्था आणि ग्रामीण भागांतील विद्यार्थी व संभाव्य उद्योजकांपर्यंत पोहोचून त्यांना मार्गदर्शन आणि तांत्रिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

राज्यातील तरुणांच्या नाविन्यपूर्ण विचारांना आणि स्टार्टअप्सना योग्य दिशा देण्याचे काम या कराराच्या माध्यमातून होईल. ग्रामीण व निमशहरी भागांतील गुणवान तरुणांना एकत्र आणून उद्योगजगताशी जोडणे आणि त्यांच्या कल्पनांना व्यावसायिक स्वरूप देणे, हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. राज्यातील महाविद्यालये, विद्यापीठे, आयटीआय आणि पॉलिटेक्निकमधील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून त्यांना 'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज'ची माहिती देण्यात येईल. निवडक नवोन्मेषक आणि स्टार्टअप्सना तज्ज्ञांचे मार्गदर्शन, तांत्रिक साहाय्य आणि योग्य



व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येणार आहे. युवकांना केवळ रोजगार शोधणारे न ठेवता सक्षम उद्योजक म्हणून घडविण्याचा प्रयत्न केला जाईल. या सहकार्यामुळे राज्यातील शाश्वत विकास, नवोपक्रम आणि रोजगारनिर्मितीला गती मिळेल, असा विश्वास मंत्री लोढा यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर अंतर्गत कार्यरत असलेल्या गाव तिथे उद्योजक इनक्यूबेशन कौन्सिलचे अध्यक्ष रवींद्र माणगावे म्हणाले की, ग्रामीण भागातील युवक आणि महिलांना रोजगार मागणारे नव्हे, तर रोजगार निर्माण करणारे उद्योजक बनविणे, हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे. ग्रामीण भागातील अनेक युवक, महिला आणि स्थानिक कारागिरांकडे व्यवसाय सुरू करण्याची क्षमता व कल्पना आहेत. मात्र, योग्य मार्गदर्शन, भांडवल, तंत्रज्ञान, बाजारपेठ आणि शासकीय योजनांची माहिती उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या व्यवसायवाढीला मर्यादा येतात. ही दरी भरून काढण्यासाठी संस्था गावपातळीपासून जिल्हा आणि राज्यस्तरापर्यंत कार्यरत आहे. राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये टप्प्याटप्प्याने जिल्हास्तरीय उद्योगविषयक मार्गदर्शन आणि प्रत्यक्ष रोजगारनिर्मितीसाठी संस्था काम करीत आहे. 'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज' स्पर्धेसाठीही जास्तीत जास्त सहकार्य करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर आणि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रीकल्चर अंतर्गत कार्यरत गाव तिथे उद्योजक इनक्यूबेशन कौन्सिलचे अध्यक्ष रवींद्र माणगावे यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. आशिष पेडणेकर, करुणाकर शेट्टी, शिवाजी मानकर, शिखर जैन, रामेश्वर पवार, सुरेश घोरपडे, अण्णासाहेब पाटील, दिवाकर केसकर, ॲड. रिचा पाठक, अक्षता भांबळे, विशाल बंडगर आणि जितू चव्हाण यावेळी उपस्थित होते.

थोडक्यात पण महत्वाचे

पाणीटंचाईचे गावनिहाय कृती आराखडे २५ ऑक्टोबरपर्यंत सादर करावेत

मुंबई : नागपूर, अमरावती आणि कोकण विभागांतील संभाव्य पाणीटंचाईच्या विविध टप्प्यांसाठी वस्तुनिष्ठ व गावनिहाय कृती आराखडे येत्या २५ ऑक्टोबरपर्यंत सादर करावेत. तसेच, जलजीवन मिशनअंतर्गत ७५ ते ९९ टक्के प्रगती झालेल्या पाणीपुरवठा योजना प्राधान्याने पूर्ण करून कार्यान्वित कराव्यात, असे निर्देश पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले. मंत्री पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथिगृह येथे झालेल्या बैठकीत नागपूर, अमरावती आणि कोकण विभागांतील पाणीपुरवठा योजना, भूजल पातळी आणि संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर करावयाच्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. सध्या या विभागांत गंभीर पाणीटंचाई नसली, तरी आगामी महिन्यांतील संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने आतापासूनच सज्ज राहावे. अधिकारी, लोकप्रतिनिधी, सरपंच आणि ग्रामपंचायतींशी चर्चा करून तसेच प्रत्यक्ष पाहणीच्या आधारे कृती आराखडे तयार करावेत, अशा सूचना त्यांनी दिल्या. जलजीवन मिशनअंतर्गत अंतिम टप्प्यात असलेल्या योजनांमधील पाइपलाइन, पंप, वीजजोडणी, रोहित्र आदींसंबंधीची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावीत. ७५ टक्क्यांपेक्षा अधिक प्रगती झालेल्या योजनांची पॅकेजविषयक माहिती पूर्ण करून प्रमाणित करावी.

मुंबईतील इमारतींच्या समूह पुनर्विकासाचे प्रस्ताव गतीने मार्गी लावावे

मुंबई : मुंबईतील जुन्या इमारतींचा समूह पुनर्विकास करून रहिवाशांना सुरक्षित आणि दर्जेदार निवास उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने विविध भागांतील पुनर्विकासाच्या प्रस्तावांचा विस्तृत आढावा विधानपरिषद उपसभापती सचिन अहिर यांनी घेतला. रहिवाशांचे व्यापक हित डोळ्यासमोर ठेवून हे प्रस्ताव गतीने मार्गी लावावेत, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. मुंबईतील विविध भागांतील इमारतींच्या समूह पुनर्विकासाच्या प्रस्तावांचा आढावा घेण्यासाठी उपसभापती अहिर यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवन येथे बैठक झाली. यावेळी पिंपळेश्वर, इराणी चाळ व वाणी चाळ; सातरस्ता-जेकब सर्कल, धोबी घाट परिसरातील विविध इमारती; उमरखाडीतील म्हाडाच्या ८१ इमारती व परिसरातील खासगी इमारती; तसेच परळ-प्रभादेवी येथील जगन्नाथ भाटणकर मार्गावरील रस्तारुंदीमुळे बाधित झालेल्या १९ इमारतींच्या समूह पुनर्विकासाच्या प्रस्तावांवर तपशीलवार चर्चा करण्यात आली. बैठकीत संबंधित इमारतींच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांशी उपसभापती अहिर यांनी चर्चा केली. इमारतींचे रहिवासी व पदाधिकाऱ्यांनी पुनर्विकासासंदर्भातील आपल्या अपेक्षा, अडचणी आणि विविध प्रश्न मांडले.

आरटीएस सेवांच्या कामगिरीत पूर्ण उद्दिष्ट साध्य करावे

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत प्राप्त अर्जांचा विहित कालमर्यादेत निपटारा करावा, नागरिकांनी मागणी केलेल्या अधिसूचित सेवांच्या वितरणाच्या कामगिरीत ९० टक्क्यांपेक्षा अधिक उद्दिष्ट साध्य करावे, असे निर्देश महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव यांनी आरटीएस डॅशबोर्डच्या आढाव्याविषयी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी तसेच सर्व प्रशासकीय विभागांच्या सचिवांच्या बैठकीमध्ये दिले. महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचे कार्यालयात झालेल्या या आढावा बैठकीस मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मृद व जलसंधारण सचिव जितेंद्र पापळकर, आयोगाचे विशेष कार्य अधिकारी दिलीप शिंदे, महाआयटी महामंडळाचे मुख्य परिचलन अधिकारी, भगवान पाटील यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. बैठकीस राज्यातील सर्व जिल्हाधिकारी तसेच सर्व प्रशासकीय विभागांचे सचिव दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते. यावेळी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या सेवा वितरणाच्या कामगिरीचे मूल्यमापन आरटीएस डॅशबोर्डवरील आकडेवारीच्या आधारे जिल्हानिहाय आणि विभागनिहाय करण्यात आले. याद्वारे उपलब्ध माहितीनुसार ९० टक्क्यांपेक्षा अधिक साध्य करता येईल.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजारोहणाचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निमंत्रण

■ नवी दिल्ली(दै. संध्या)

नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होत असलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या भव्य पर्वाचा शुभारंभ ठरणाऱ्या ३१ ऑक्टोबरच्या ध्वजारोहण सोहळ्याचे निमंत्रण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातील सदस्य आणि अधिकारी – पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने दिले.

राष्ट्रपती भवन येथे झालेल्या या भेटीत मुख्यमंत्र्यांनी राष्ट्रपतींना येत्या ३१ ऑक्टोबर रोजी नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे आयोजित ध्वजारोहण सोहळ्याचे औपचारिक निमंत्रण तसेच महाराष्ट्राच्या आध्यात्मिक परंपरेपासून आदिवासी उद्योजकता, वस्त्रकला, कृषिसमृद्धी



आणि खाद्यसंस्कृतीपर्यंतच्या वैविध्यपूर्ण वारशाची ओळख करून देणारा विशेष भेटवस्तू संचही प्रदान केला. राष्ट्रपती यांना ध्वजारोहणाच्याच दिवशी होणाऱ्या गोदा आरती, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाच्या संकेतस्थळाचे उदघाटन, कुंभमेळा गीताचे लोकार्पण, कुंभमेळ्यावर आधारित कॉफीटेबल बूक आणि कुंभमेळा टपाल तिकिटाचे अनावरणासाठी देखील आमंत्रित करण्यात आले आहे. या प्रसंगी अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा, आपत्ती व्यवस्थापन व कुंभमेळा मंत्री तथा नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन व विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ, नाशिकच्या महापौर हिमगौरी आडके-आहेर, त्र्यंबक नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार, त्र्यंबकेश्वर देवस्थानचे अध्यक्ष तथा धर्मादाय सहआयुक्त न्यायमूर्ती विवेक सोनुणे आदी यावेळी उपस्थित होते.

नांदेड जिल्ह्यातील १ लाख २ हजार २१८ शेतकऱ्यांना ८६१.५६ कोटींचा लाभ

■ नांदेड(दै. संध्या)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत नांदेड जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ देण्याची प्रक्रिया संगणकीय प्रणालीद्वारे सुरू आहे. आतापर्यंत शासनाकडून जाहीर करण्यात आलेल्या तीन याद्यांमध्ये जिल्ह्यातील १ लाख ९७ हजार ९१२ शेतकरी पात्र ठरले असून, त्यापैकी १ लाख ४१ हजार ८३५ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले आहे. आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेल्या १ लाख २ हजार २१८ पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर ८६१.५६ कोटी रुपये इतकी कर्जमुक्तीची रक्कम जमा करण्यात आली आहे.

शासनाच्या दि. २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार ही योजना राज्यात लागू करण्यात आली आहे. योजनेत अल्प, अत्यल्प किंवा बहुभूधारक असा भेदभाव न करता पात्र वैयक्तिक शेतकऱ्यांना लाभ देण्यात येत आहे. कुटुंबाऐवजी वैयक्तिक शेतकरी हा लाभाचा घटक मानण्यात आला आहे. योजनेअंतर्गत दि. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत घेतलेले अल्पमुदतीचे पीककर्ज तसेच या कालावधीत पुनर्गठित झालेले अल्पमुदतीचे पीककर्ज दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असून दि. ३१ मार्च २०२६ रोजीपर्यंत परतफेड झालेले नसल्यास, संबंधित पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ देण्यात येणार आहे.ज्या शेतकऱ्यांकडे २ लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज बाकी आहे, त्यांच्यासाठी एकरकमी परतफेड योजना (OTS) लागू आहे.

शिक्षक मतदारसंघाची मतमोजणी समन्वयाने पार पाडावी : विभागीय आयुक्त

■ अमरावती(दै. संध्या)

विधान परिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूकीची मतमोजणी मंगळवार, 27 ऑक्टोबर रोजी होणार आहे. या निवडणुकीत पसंतीक्रमानुसार मतमोजणी करण्याची प्रक्रिया राहणार आहे. त्यामुळे मतमोजणीला मोठा कालावधी लागणार आहे. त्यामुळे मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी-कर्मचारी यांनी शिक्षक मतदारसंघाची मतमोजणी समन्वयाने व्यवस्थित पार पाडावी, असे आवाहन विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी नयना गुंडे यांनी केले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आज विधान परिषदेच्या शिक्षक मतदारसंघाच्या मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांचे प्रशिक्षण पार पडले. यावेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर (वाशिम), प्रविणकुमार देवरे (बुलडाणा), विकास मिना (यवतमाळ), अपर आयुक्त संजय जाधव, सहआयुक्त वासंती माळी, जात पडताळणीचे अध्यक्ष नरेंद्र फुलझेले (बुलडाणा), सोनाप्पा यमगर (यवतमाळ) आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. विभागीय आयुक्त श्रीमती गुंडे यांनी, शिक्षक मतदारसंघाची निवडणूक इतर सार्वत्रिक निवडणुकीपेक्षा वेगळी आहे. यातील मतदान हे पसंतीक्रमानुसार द्यावे लागते. त्यामुळे मतमोजणीवेळी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांनी दक्षता बाळगणे गरजेचे आहे. प्रशिक्षणामुळे मतमोजणीच्यावेळी येणाऱ्या समस्या आणि संकल्पना स्पष्ट होण्यास मदत मिळाली आहे. मतमोजणीसाठी नियुक्तांनी याआधीही कार्य पार पाडले आहे.

अमरावती नदी पुन्हा प्रवाही होईपर्यंत प्रयत्न थांबणार नाही : रावल

■ धुळे (दै. संध्या)

दोंडाईचा शहराची जीवनवाहिनी असलेली अमरावती नदी पुन्हा प्रवाही करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांसह तज्ज्ञ संस्था आणि नागरिकांच्या सहभागातून व्यापक उपाययोजना करण्यात येतील. नदीचे पुनरुज्जीवन करताना पावसाचे पाणी अडविणे, ते जमिनीत मुरविणे, नैसर्गिक जलप्रवाह मोकळे करणे आणि वृक्षारोपणाला प्राधान्य देण्यात येईल. अमरावती नदीत पुन्हा पाणी येईपर्यंत आपले प्रयत्न थांबणार नाहीत, असा निर्धार राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दोंडाईचा येथे व्यक्त केला.

पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्याकडे अमरावती नदीच्या पुनरुज्जीवनासाठी तज्ज्ञ पथक पाठविण्याची मागणी केली होती. त्यानुसार केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या राष्ट्रीय स्वच्छ गंगा अभियान (NMCG) आणि राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालय (NRCD) यांच्या संयुक्त पथकाने दोंडाईचा येथे भेट देऊन नदीच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. नदी आटण्यामागील कारणांचा शोध घेणे, तिच्या नैसर्गिक प्रवाहातील अडथळे ओळखणे आणि पुनरुज्जीवनासाठी योग्य उपाययोजना सुचविणे हा या दौऱ्याचा प्रमुख उद्देश असल्याचे पालकमंत्री रावल यांनी सांगितले.

यावेळी केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या राष्ट्रीय नदी संवर्धन संचालनालयाचे संचालक तथा सहसचिव मिलिंद पानपाटील, राष्ट्रीय स्वच्छ गंगा अभियानाचे शास्त्रज्ञ 'डी' उपेंद्र व्ही. धोंडे, मृद व जलसंधारण विभागाचे उपसचिव अरुण गंगाधर गाळवे, नाशिक येथील महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेचे उपविभागीय अधिकारी वामन चव्हाण, नंदुरबार येथील भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे वरिष्ठ भूवैज्ञानिक सुनील शिंदे, धुळे येथील भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे वरिष्ठभूवैज्ञानिक गिरीशकुमार भारे, उपविभागीय अभियंता अभय पाटीदार, कनिष्ठ अभियंता दीपक सैनी व अमोल दिलीप वागुळ, तहसीलदार नितीनकुमार देवरे, दोंडाईचा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी देवेंद्र परदेशी, अभियंता शिवनंदन राजपूत नंदुरबार येथील भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेचे कनिष्ठ भूवैज्ञानिक प्रणव धनगर, शिंदखेडा पंचायत समितीचे विस्तार अधिकारी दिलीप बागले, दोंडाईचा उपविभागीय कार्यालयाचे राजेश धोलप आणि शिंदखेडा तालुका कृषी अधिकारी सुधीर ईशी आदी उपस्थित होते. नदी पुन्हा प्रवाही करण्यासाठी केवळ बंधारे बांधून पाणी अडविणे पुरेसे नाही, तर ते जमिनीत मुरविणेही आवश्यक आहे.

राष्ट्रीय मोटरसायकल रॅलीचे पालकमंत्री नितेश राणे यांच्या उपस्थितीत सिंधुदुर्गात स्वागत

जिल्हा पोलीस दल, विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत तुतारी, ढोल-ताशांच्या गजरात पुष्पवृष्टीने स्वागत; 'फाईट अगेन्स्ट ड्रग्ज'चा संदेश

■ सिंधुदुर्ग(दै. संध्या)

भारताचे पहिले गृहमंत्री आणि लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त गुजरातमधील केवडिया येथील 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' येथे ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित राष्ट्रीय एकता परेडच्या पार्श्वभूमीवर देशातील विविध राज्ये व केंद्रशासित प्रदेशांच्या पोलीस दलांमार्फत आयोजित राष्ट्रीय मोटरसायकल रॅलीचे सिंधुदुर्ग जिल्ह्यात बांधा येथे आगमन झाले. राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांच्या प्रमुख उपस्थितीत या रॅलीचे स्वागत करण्यात आले.

पोलीस दलाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत तुतारी आणि ढोल-ताशांच्या गजरात तसेच पुष्पवृष्टी करून रॅलीतील सहभागी पोलीस अधिकारी व रायडर्स यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.लक्षद्वीप, केरळ, कर्नाटक आणि गोवा या राज्यांमधून आलेले पोलीस अधिकारी, अंमलदार आणि रायडर्स या रॅलीत सहभागी झाले आहेत. राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करण्यासोबतच 'फाईट अगेन्स्ट



ड्रग्ज' या घोषवाक्याद्वारे अमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी जनजागृती करणे आणि अमली पदार्थमुक्त भारताचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवणे हा या रॅलीचा प्रमुख उद्देश आहे.बांधा येथील स्वागत कार्यक्रमात पालकमंत्री नितेश राणे यांनी लक्षद्वीप, केरळ, कर्नाटक आणि गोवा येथून आलेल्या सर्व पोलीस अधिकारी, अंमलदार आणि रायडर्स यांचे सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या वतीने स्वागत केले. अमली पदार्थांविरोधातील लढा ही आजच्या काळाची गरज असून, भावी पिढीने या विषयाकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. देश अमली पदार्थमुक्त करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या या अभियानाला सर्वांनी पाठबळ द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. या रॅलीच्या माध्यमातून अमली पदार्थांविरोधातील जनजागृतीला जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर चालना मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. रॅलीत सहभागी झालेल्या तसेच आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांचे त्यांनी अभिनंदन करून सर्व रायडर्सना पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच राज्यातील पुढील प्रवासाला सुरुवात होताना मान्यवरांनी हिरवा झेंडा दाखवला.

जिल्ह्यातील कुडाळ हायस्कूल, पुष्पसेन ज्ञानपीठ, हुमरमळा तसेच जिल्हा मुख्यालय परिसरासह विविध ठिकाणी या रॅलीच्या माध्यमातून अमली पदार्थांविरोधातील लढ्याचा संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे तरुण पिढीपर्यंत हा संदेश पोहोचविण्यास मदत झाली. अमली पदार्थांचे व्यसन व्यक्ती, कुटुंब आणि समाजावर गंभीर परिणाम घडवते. त्यामुळे तरुणाईला या विळख्यापासून दूर ठेवण्यासाठी जनजागृती आणि सामाजिक सहभाग महत्त्वाचा असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित करण्यात आले.


राष्ट्रीय एकता दिवसाच्या निमित्ताने आयोजित या रॅलीमुळे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या विचारांना उजाळा मिळण्यासोबतच अमली पदार्थांविरोधातील जनजागृतीचा संदेशही व्यापक स्वरूपात पोहोचत आहे.

यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष प्रमोद कामत, जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे, पोलीस अधीक्षक डॉ. मोहन दहिकर, अपर पोलीस अधीक्षक नयोमी साटम, उपाध्यक्ष दादा साईल, जिल्हा बँक अध्यक्ष मनीष दळवी यांच्यासह पोलीस अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.



दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



समाजासाठी झटणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा राज्यस्तरीय पुरस्काराने गौरव

चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते पुरस्कार वितरण; पत्रकारांच्या आरोग्याचा प्रश्नही ऐरणीवर

■ पुणे (दै. संध्या)

समाजाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देत आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या कर्तृत्ववान मान्यवरांचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशन आणि महाराष्ट्र राज्य डिजिटल मीडिया, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा - २०२६' उत्साहात पार पडला. महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. सामाजिक बांधिलकी, संघर्ष, जिद्द आणि कर्तृत्वाचा गौरव करणाऱ्या या सोहळ्याने समाजासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना नवी प्रेरणा दिली.

या सोहळ्याला ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, ज्येष्ठ पत्रकार व लोकमतचे समूह संपादक विजय बाविस्कर, एबीपी माझाच्या उपकार्यकारी संपादक सरिता कौशिक, कोहिनूर ग्रुपचे प्रमुख कृष्णकुमार गोयल आणि सीआयडी अधिकारी सुनील फुलारी यांची प्रमुख उपस्थिती होती. समाजाच्या तळागाळात राहून विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या अनेक व्यक्तींचे योगदान अनेकदा प्रसिद्धीपासून दूर राहते. अशा व्यक्तींच्या कार्याची दखल घेऊन त्यांना सन्मानित करणे, त्यांच्या यशस्वी वाटचालीला प्रोत्साहन देणे आणि नव्या पिढीसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण करणे, हा या पुरस्कार सोहळ्यामागील मुख्य उद्देश होता. उद्योग, शिक्षण, सामाजिक कार्य, कला, न्याय आणि आरोग्य अशा विविध क्षेत्रांतील मान्यवरांना पुरस्कार प्रदान करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. केवळ यशाचा सन्मान नव्हे, तर त्या यशामागील संघर्ष, सातत्य आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित करणारा हा सोहळा ठरला. यावेळी विविध क्षेत्रांत यश मिळविणाऱ्या पुरस्कारार्थींच्या कार्याची माहिती जाणून घेत त्यांनी त्यांच्या योगदानाचे कौतुक केले. समाजाच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या व्यक्तींचा सन्मान हा समाजातील सकारात्मक कार्याला बळ देणारा उपक्रम असल्याची भावना या सोहळ्यातून व्यक्त झाली. उद्योग क्षेत्रातील योगदानाबद्दल हरीश वरू, अक्षय गंगानी, नितीन भागवत, स्वाती वल्लभ नगरकर, दीपाली कांबळे, आशिष कामठे, श्वेता उपाध्याय, ऋषिकेश फुफाणे, शशांक शिलिमकर, आशिष अग्रवाल आणि डॉ. स्वप्नील अशोक कांबळे यांना उद्योगरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. कृष्णकुमार गोयल यांना कार्य गौरव विशेष सन्मान, मेघराज राजेभोसले यांना कला योगदान गौरव - २०२६, तर पुष्कराज भालचंद्र पाठक यांना शिक्षणरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. सामाजिक क्षेत्रातील योगदानासाठी संजय अग्रवाल, ममता सिंधुताई सपकाळ, ज्योती सावर्डेकर, प्रज्ञा जयेश टांक, प्रशांत कनोजिया आणि ॲड. प्रिया शाह यांना समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. न्याय क्षेत्रातील योगदानाबद्दल ॲड. ओंकार लोंढे आणि ॲड. आबिद मुलाणी यांना न्याययोद्धा पुरस्कार, आरोग्य क्षेत्रातील कार्यासाठी डॉ. सत्यशील नाईक यांना आरोग्यरत्न पुरस्कार, तर फॅशन क्षेत्रातील आयोजनातील योगदानाबद्दल योगेश पवार यांना बेस्ट फॅशन शो ऑर्गनायझर पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र राज्य डिजिटल मीडिया, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ भोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. उपाध्यक्ष समीर देसाई आणि जनसंपर्क अधिकारी (पीआरओ) सागर बोदगिरे यांनी आयोजनाची जबाबदारी सांभाळली. MIDAS BUILT INFRA आणि NJ GROUP हे कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक होते. समाजासाठी निष्ठेने काम करणाऱ्या व्यक्तींना सन्मानाचे व्यासपीठ उपलब्ध करून देत त्यांच्या कार्याची प्रेरणा व्यापक समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या सोहळ्यातून करण्यात आला. कर्तृत्वाचा गौरव, सामाजिक बांधिलकीची जाणीव आणि नव्या कार्याची प्रेरणा यांचा संगम ठरलेला हा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.



पत्रकारांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष नको : चंद्रकांतदादा पाटील

कार्यक्रमात बोलताना चंद्रकांतदादा पाटील यांनी पत्रकारांच्या आरोग्याचा महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला. बातम्यांचा पाठपुरावा, धावपळीचे वेळापत्रक आणि कामाचा वाढता ताण यांमुळे पत्रकारांना अनेकदा स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करावे लागते. पत्रकारांच्या आरोग्याचा प्रश्न महत्त्वाचा असून, या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

थोडक्यात पण महत्वाचे



भाईचारा समाज संघातर्फे अखंड रामायण पाठ; रुग्णवाहिकेचे लोकार्पण

पुणे : दैनिक संध्या

भाईचारा समाज संघ (उत्तर भारतीय) यांच्या वतीने वार्षिक उत्सवानिमित्त आयोजित श्री रामचरितमानस अखंड रामायण पाठ सोहळा १९ व २० ऑक्टोबर रोजी मंगळवार पेठ, पुणे येथे भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी रामायण पूजन, अखंड रामायण पाठाची सांगता, हवन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते प्राणव दादा चौधरी यांच्या शुभहस्ते रुग्णवाहिकेचे लोकार्पण करण्यात आले. या उपक्रमामुळे गरजू रुग्णांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यास मदत होणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संस्थापक राजेंद्र पटेल यांच्यासह संघाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. धार्मिक परंपरेसोबत सामाजिक सेवेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांचा प्रतिसाद लाभला.



रेणुका सांस्कृतिक कला केंद्राला धार्मिक वारसा दसऱ्यानिमित्त होम-हवन

■ वर्षभर कलेच्या माध्यमातून सांस्कृतिक परंपरा जपणाऱ्या कलावंतांकडून नवरात्रोत्सवात श्री तुळजाभवानीची भक्तिभावाने सेवा

दौंड : दैनिक संध्या

दौंड तालुक्यातील चौफुला येथील रेणुका सांस्कृतिक कला केंद्रात दसरा आणि नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने मंगळवार, दि. २० ऑक्टोबर २०२६ रोजी श्री तुळजाभवानी मंदिरात धार्मिक वातावरणात होम-हवन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून देवीची मनोभावे पूजा-अर्चा करून सुख, समृद्धी, आरोग्य आणि भरभराटीसाठी प्रार्थना करण्यात आली. रेणुका सांस्कृतिक कला केंद्राच्या वतीने दरवर्षी नवरात्रोत्सव भक्तिभावाने साजरा केला जातो. वर्षभर विविध सांस्कृतिक कला सादर करून आपल्या कलेच्या माध्यमातून प्रेक्षकांचे मनोरंजन करणारे येथील कलावंत नवरात्रोत्सवाच्या काळात धार्मिक परंपरा जपत श्री तुळजाभवानी देवीची सेवा करतात. कलेसोबतच श्रद्धा, भक्ती आणि परंपरेचा वारसा जपण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जात आहे. या धार्मिक कार्यक्रमात रेणुका सांस्कृतिक कला केंद्राच्या संचालिका रेखा काळे, सुषमा काळे, बाळासाहेब काळे आणि बाबासाहेब काळे यांच्यासह कला केंद्राशी संबंधित कलावंतांनी सहभाग घेतला. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने देवीची मनोभावे पूजा-अर्चा करून होम-हवन विधी पार पाडण्यात आला. धार्मिक विधी आणि देवीच्या भक्तीमय वातावरणामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. रेणुका सांस्कृतिक कला केंद्र हे केवळ सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणारे केंद्र नसून धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांशी नाळ जोडणारे व्यासपीठ म्हणूनही कार्यरत आहे. वर्षभर कला सादर करताना विविध सांस्कृतिक परंपरांचे जतन करणारे येथील कलावंत नवरात्रोत्सवात देवीच्या सेवेसाठी एकत्र येतात. श्रद्धा आणि कलेचा हा संगम या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला. दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर आयोजित करण्यात आलेल्या होम-हवन कार्यक्रमातून सर्वांच्या जीवनात सुख-शांती नांदो, कलावंतांना त्यांच्या कलेत यश मिळो आणि रेणुका सांस्कृतिक कला केंद्राची सांस्कृतिक वाटचाल अधिक समृद्ध होवो, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या कार्यक्रमाच्या वेळी ज्येष्ठ साहित्यिक दशरथ यादव, मराठा महासंघाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष राजाभाऊ जगताप,भीमथडी मराठी साहित्य प्रतिष्ठान राज्याध्यक्ष संजय सोनवणे, संभाजी ब्रिगेड पुरंदर तालुका कार्याध्यक्ष अरविंद जगताप व आदी मान्यवर उपस्थित होते.

नारायणगाव महाविद्यालयात कला शाखेचा माजी विद्यार्थी मेळावा संपन्न

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा उपयोग स्वतःबरोबरच समाजासाठीही करावा : कृषिरत्न अनिलतात्या मेहेर

■ नारायणगाव (दै. संध्या)

ग्रामोन्नती मंडळाचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नारायणगाव, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे येथे कला शाखेतील बीए व एमए शिक्षण पूर्ण केलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यासाठी १९९३ ते २०२५ या कालावधीत शिकलेले व सध्या विविध ठिकाणी कार्यरत असलेले २२५ माजी विद्यार्थी या मेळाव्यासाठी उपस्थित राहिले अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद कुलकर्णी आणि माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीकांत फुलसुंदर यांनी दिली. या मेळाव्याचे उद्घाटन ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष कृषिरत्न अनिलतात्या मेहेर यांच्या हस्ते झाले. महाविद्यालयीन विद्यार्थी जीवनामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला त्याने घेतलेल्या शिक्षणाच्या माध्यमातून समाजामध्ये योग्य करिअर तथा संधीचे मार्ग दाखवण्याचे काम हे शिक्षक करत असतात. विस्तारलेल्या करिअरच्या वाटा शोधताना प्रत्येक युवकांनी आपल्या इच्छेनुसार व आवडीनुसार त्या त्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असते. विद्यार्थी घडविण्याचे कार्य शिक्षक करीत असतात, त्यासाठी संस्था आणि प्रशासन त्यांच्या मागे खंबीरपणे उभी असते. प्रत्येक विद्यार्थ्याने एखादा निर्णय किंवा करिअर निवडताना तो भक्कमपणे व आत्मविश्वासाने निवडावा की जेणेकरून तो त्याच्या आवडीच्या क्षेत्रात योग्य करिअर करून समाज जीवनामध्ये यशस्वी होऊ शकतो असे मत कृषिरत्न अनिलतात्या मेहेर यांनी मांडले. या माजी विद्यार्थी मेळाव्यासाठी कला शाखेतील अभय वारुळे आणि मंदार रत्नपारखी यांनी सांस्कृतिक कार्यक्रम प्रदर्शित करून माजी विद्यार्थ्यांचा या कार्यक्रमातील उत्साह वाढविला. यावेळी या उपक्रमासाठी ग्रामोन्नती मंडळाचे विश्वस्त प्रकाशमामा पाटे उपस्थित होते. महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी प्रा.डॉ.शाकुराव कोरडे लिखित बोलके व्हा या पुस्तकाचे प्रमुख अतिथींच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. नारायणगाव महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने २००८ ते २०१९ या कालावधीत शिक्षण आणि समाज यांची सांगड घालत ग्रामविकास आणि दुर्ग संवर्धन या मोहिमेअंतर्गत विशेष उपक्रम राबविले व जनजागृती केली. यावर आधारित डॉ.शरद कापले, डॉ.श्रीकांत फुलसुंदर आणि डॉ.लहू गायकवाड लिखित श्रमसंस्कारातून ग्रामविकास आणि दुर्ग संवर्धन या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. सहभागी प्रत्येक माजी विद्यार्थ्यांना हे पुस्तक भेट म्हणून देण्यात आले.



कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रामध्ये सहभागी उपस्थित माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनातील आपल्या आठवणींना उजाळा देत मी कसा घडलो याविषयी उत्स्फूर्तपणे आपली मनोगते मांडली. माजी विद्यार्थी मेळावा यशस्वी करण्यासाठी या माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष डॉ.विनोद पाटे, सचिव डॉ.वैभव शिंदे, खजिनदार प्रा. अक्षय भोर व कार्यकारणी मधील सर्व सदस्य यांनी अधिक परिश्रम घेतले. कला शाखेचा इतिवृत्तान्त कला शाखा समन्वयक डॉ. शरद कापले यांनी आपल्या मनोगतातून सांगितला. या संपूर्ण मेळाव्याचे सूत्रसंचालन प्रा.पूजा वाव्हळ यांनी केले तर आभार माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष प्रा. डॉ.श्रीकांत फुलसुंदर यांनी व्यक्त केले.

रखडलेल्या पाणीपुरवठा योजनांवरून जिल्हा परिषदेत वाद

■ पुणे (दै. संध्या)

पाणी योजनांची कामे रखडलेली, तर कुठे दुर्गम गावांना पाण्याचा स्रोतच अपुरा पडत आहे. गावांना पाणी नाही आणि टंचाईच्या तक्रारी करूनही उपाययोजना होत नसल्याने जिल्हा परिषद सदस्यांनी प्रशासनाला जाब विचारला. कडूस, मुळशीसह इतर प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांच्या दुरवस्थेवरून सर्वसाधारण सभेत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाने आठवडाभरात कार्यवाही पूर्ण करून अहवाल सादर करावा, असे निर्देश अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांनी दिले. संभाव्य पाणीटंचाई आणि त्यावरील उपाययोजनांच्या आराखड्याबाबत जिल्हा परिषदेची सर्वसाधारण सभा गुरुवारी (ता. २२) वीरधवल जगदाळे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे यांच्यासह विविध विषय समित्यांचे सभापती उपस्थित होते. पाणीटंचाईचा आराखडा अंतिम करून जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. कडूस प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची कामे अपूर्ण असल्याने गावांना पाणी मिळत नसल्याचा मुद्दा जिल्हा परिषद सदस्य तनुजा घनवट यांनी उपस्थित केला.

श्रद्धेय अशोकजी सिंघल यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त हिंदू समरसता संगमचे आयोजन

विश्व हिंदू परिषदेच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या वतीने २४ ऑक्टोबर रोजी उद्घाटन; पारंपरिक वाद्य वादनाचा विश्वविक्रम साकारणार

■ पुणे (दै. संध्या)

विश्व हिंदू परिषदेच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या वतीने श्रद्धेय अशोक सिंघल यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त हिंदू समरसता संगम या उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन शनिवार, २४ ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे.

स्वारगेट येथील श्री गणेश कला क्रीडा रंगमंच येथे सायंकाळी सहा वाजता हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने सायंकाळी पाच वाजता पंच पारंपरिक वाद्य वादनाचा विश्वविक्रम साकारण्याचा विशेष कार्यक्रमही आयोजित करण्यात असून सदर विश्व विक्रम श्रद्धेय अशोकजी यांच्या स्मृतीस अर्पण करण्यात येणार आहे अशी माहिती प्रांत मंत्री किशोर चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली. पत्रकार परिषदेस प्रांत सहमंत्री नितीन वाटकर, निधी प्रमुख धनाजी शिंदे, मातृशक्ती प्रमुख प्रिया रसाळ, दुर्गावहिनी संयोजिका सोनाली नाथ, विभाग मंत्री संतोष अनगोलकर, दिनेश लाड, कार्यक्रम व्यवस्था सह प्रमुख करण घोडके व श्रीकांत चिल्लाळ उपस्थित होते.

श्रद्धेय अशोकजी सिंघल उद्घाटन समारोह समितीचे अध्यक्ष ॲड. एस.के. जैन म्हणाले, कार्यक्रमाला विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय अध्यक्ष आलोककुमार प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. श्री श्री १००८ आचार्य श्री स्वामी जितेंद्रनाथमहाराज यांचे पावन सान्निध्य लाभणार असून, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक नानासाहेब जाधव हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. किशोर चव्हाण म्हणाले, श्रद्धेय अशोकजी सिंघल यांच्या त्याग, समर्पण आणि राष्ट्रचिंतनाला वंदन करण्याच्या उद्देशाने जन्मशताब्दी वर्षानिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे उच्चांकी वीजमागणीत दिलासा

■ पुणे (दै. संध्या)

एल निनोच्या प्रभावामुळे पाऊस कमी झाल्याचा परिणाम म्हणून ऑक्टोबर महिन्यात अभूतपूर्व उष्णता जाणवत आहे. मुंबईसह राज्यात १० ऑक्टोबर रोजी आतापर्यंतची सर्वाधिक ३८,०२१ मेगावॅट विजेची मागणी नोंदविली गेली असून उच्चदाब वीज प्रणालीतून ३२,९२१ मेगावॅट आणि मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेच्या अंतर्गत सौर प्रकल्प व प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या माध्यमातून ५१०० मेगावॅट वीज उपलब्ध झाल्याने उच्चांकी वीज मागणी पूर्ण करण्यात आली. सौर ऊर्जा योजनांमुळे दिवसा वीज उपलब्ध होण्यासोबत वीजखरेदीतील बचतीचा लाभ होत आहे. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी सांगितले की, दुष्काळी परिस्थितीत राज्यात उन्हाच्या झळा जाणवत आहेत. विजेची मागणी प्रचंड वाढली असताना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेऊन सुरू केलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० योजनेचा मोठा लाभ झाला आहे. त्यासोबत प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून राज्यात छतांवर उभारलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पांचाही लाभ झाला आहे. या योजनांमुळे दिवसा वीज मागणी वाढलेली असताना विजेची उपलब्धता आणि वीज खरेदीतील मोठी बचत असा दुहेरी दिलासा मिळाला आहे.



राज्यातील सर्व ४८ लाख कृषी पंप सौर ऊर्जेवर चालविण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत एकूण १६,००० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे. आतापर्यंत सात हजार मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. सध्या या योजनेमुळे व काही तांत्रिक उपायांचा अवलंब करून ८० टक्के कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करण्यात येत आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे १० ऑक्टोबर या उच्चांकी मागणीच्या दिवशी सर्वाधिक ५५०० मेगावॅट वीज पुरवठा दुपारी बारा वाजताच्या सुमारास झाला. सौरऊर्जा प्रकल्पात सूर्यप्रकाशाच्या उपलब्धतेनुसार वीजनिर्मिती बदलत असते. त्यातून होणाऱ्या वीजनिर्मितीमुळे दिवसा वीजमागणी मोठ्या प्रमाणावर असताना राज्याला दिलासा मिळत आहे.

मुंबईसह राज्यात विजेच्या ग्रीडमधील मागणीनुसार दि. १० ऑक्टोबर रोजी उच्चांकी मागणीची ३२,९२१ मेगावॅट इतकी नोंद झाली. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत विकेंद्रित स्वरुपाचे सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प उभे करून स्थानिक उपकेंद्रांना वीज पुरविली जाते. परिणामी त्याद्वारे निर्माण झालेल्या विजेची नोंद राज्याच्या ग्रीडमधील मागणीमध्ये समाविष्ट होत नाही. त्याच प्रकारे प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतही स्थानिक पातळीवर वीज तयार करून घरात वापरली जाते, त्यामुळे ग्रीडमधील विजेच्या मागणीमध्ये त्याची नोंद होत नाही. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेद्वारे व प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेमुळे उपलब्ध वीज ध्यानात घेता १० ऑक्टोबर रोजी राज्यात प्रत्यक्षात एकूण ३८,०२१ मेगावॅट वीज मागणी होती, असे स्पष्ट होते. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेसह विविध योजनांमध्ये राज्यात सुमारे ११ लाख वीज ग्राहकांनी छतावर बसविलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पांची एकूण क्षमता ७,१७५ मेगावॅट झाली आहे.

या दोन योजना अंमलात आल्या नसत्या तर थेट राज्याच्या ग्रीडवर मोठा विजेचा भार येऊन मोठी समस्या निर्माण झाली असती. सध्या अनेक राज्यांमध्ये विजेच्या टंचाईमुळे निर्माण झालेली परिस्थिती हाताळताना अडचणी येत आहेत. तथापि, महाराष्ट्र राज्यात सौर ऊर्जा प्रकल्पांमुळे विजेची मागणी पूर्ण करण्यात मदत होत आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे तिहेरी लाभ

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मुळे दिवसभरात मोठ्या प्रमाणात वीज उपलब्ध झाल्यामुळे शेतीसाठी रात्रीच्या ऐवजी दिवसा वीज पुरवठा करण्यात येत आहे. या योजनेत सरासरी ३ रुपये ९ पैसे प्रती युनिट इतक्या कमी दराने वीज उपलब्ध होत असल्याने रात्रीची महाग वीज विकत घ्यावी लागत नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वीजखरेदीत बचत होत आहे. सप्टेंबर महिन्यात या योजनेतून ८७८ दशलक्ष युनिट वीज उपलब्ध झाली. रात्रीचा शेतीपंपाचा २५०० मेगावॅट इतका भार दिवसा वळविल्यामुळे कमाल वीजदराच्या तुलनेत वीजखरेदीचे ३८४ कोटी रुपये वाचले. या योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा, वीज पुरवठा व्यवस्थापनाला मोलाची मदत आणि वीजखरेदीच्या पैशाची बचत असा तिहेरी लाभ होत आहे.